रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक १९७

www.ramprahar.com

# राम प्रहर

रविवार, २ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

गुरेचोरांचा पाठलाग करून दोघांना अटक/२

हळदीकुंकू समारंभातून सुरक्षाविषयक जनजागृती/६

मोहोपाडा टायगर संघ व्हीपीएलचा मानकरी/८

## भारतीयांची स्वप्ने पूर्ण करणारा अर्थसंकल्प -पंतप्रधान मोदी



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले आहे. १४० कोटी भारतीयांची स्वप्ने पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पामुळे देशातील विकास झपाट्याने वाढेल, ज्यामुळे विकसित भारताच्या ध्येयाला अधिक चालना मिळेल तसेच आत्मनिर्भर भारत मोहिमेला चालना मिळण्यासाठी नक्कीच फायदा होईल, असे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे. अर्थसंकल्पात सरकारची तिजोरी कशी भरली जाईल यावरच लक्ष केंद्रित केले जाते, मात्र हा अर्थसंकल्प त्याच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. देशातील नागरिकांचे खिसे कसे भरले जातील, देशातील नागरिकांची बचत कशी वाढेल आणि देशातील नागरिक विकासाचे भागीदार कसे होतील याचे उदाहरण म्हणजे हा आजचा अर्थसंकल्प आहे, असेही पंतप्रधान मोदींनी नमूद केले आहे.

# विकसित भारताचा अर्थसंकल्प!

## महाराष्ट्रासाठी कोट्यवधींचा निधी

केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्रासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एमयुटीपी-३ प्रकल्पासाठी १४६५ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. पुणे मेट्रोसाठी ८३७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुळा मुठा नदी संवर्धनासाठी जायकांतर्गत २३० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेच्या चार प्रकल्पांसाठी चार हजार तीन कोटी, मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रशिक्षण संस्थेसाठी १२६ कोटी ६० लाख, मुंबई मेट्रोसाठी १६७३ कोटी ४१ लाख, महाराष्ट्र ग्रामीण दळणवळ सुधारणांसाठी ६८३ कोटी ५१ लाख, महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क-मॅग्नेट प्रकल्पासाठी ५९६ कोटी ५७ लाख, ऊर्जा संवर्धन व लिफ्ट इरिगेशन प्रकल्पासाठी १८६ कोटी ४४ लाख, इंटीग्रेटेड ग्रीन अर्बन मोबिलिटी प्रकल्प मुंबईसाठी ६५२ कोटी ५२ लाख, सर्वसमावेशक विकासासाठी आर्थिक क्लस्टर जोडणी कामांसाठी १०९४ कोटी ५८ लाख रुपयांचा निधी महाराष्ट्राला मिळाल्याचे सांगितले जात आहे.

## 12 लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शनिवारी (दि. १) देशाचा अर्थसंकल्प सादर केला. यात १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा सर्वात मोठी ठरली. मध्यमवर्गीय करदात्यांसाठी हा मोठा दिलासा आहे. या संदर्भातील आयकर विधेयक पुढील आठवड्यात संसदेत मांडले जाईल. याशिवाय विविध क्षेत्र आणि घटकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या अर्थसंकल्पाचे सर्व स्तरांतून कौतुक केले जात आहे.**





### काय स्वस्त?

**दागिने, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, कर्करोग व इतर दुर्मिळ आजारांवरील ३६ औषधे, कोबाल्ट उत्पादने, एलईडी, झिंक, लिथियम-आयन बॅटरी स्क्रॅप, जहाजांच्या बांधणीचा कच्चा माल, फ्रोझन फिश पेस्ट, चामड्याच्या वस्तू, खेळणी, रेडिमेड कपडे, इथरनेट स्विचेसचे कॅरीअर ग्रेड, १२ प्रकारची खनिजे, ओपन सेल (पेशी), सागरी उत्पादने**

### काय महाग?

**घरे, फ्लॅट टीव्ही, विणलेले कपडे**



### अशी असेल कररचना

- ४ लाखांपर्यंत : शून्य
- ४ ते ८ लाखांपर्यंत : ५ टक्के
- ८ ते १२ लाखांपर्यंत : १० टक्के
- १२ ते १६ लाखांपर्यंत : १५ टक्के
- १६ ते २० लाखांपर्यंत : २० टक्के
- २० ते २४ लाखांपर्यंत : २५ टक्के
- २४ लाखांच्या वर : ३० टक्के

*✲ नोकरदारवर्गासाठी स्टँडर्ड डिडक्शन ७५ हजार रुपये ठेवण्यात आले आहे. त्यामुळे पगारदारांचे वार्षिक उत्पन्न १२ लाख ७५ हजार रुपयांपर्यंत करमुक्त असेल.*

“ देशातील मध्यमवर्गासाठी स्वप्नवत अर्थसंकल्प आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केला. १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करून त्यांनी एक मोठा दिलासा मध्यमवर्गाला दिला आहे. ग्रामीण भारताचा चेहरामोहरा बदलणारा आणि नागरिककेंद्रित गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारा हा अर्थसंकल्प आहे.

**-देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

“ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचे पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात येणार याची खात्री देणारा केंद्र सरकारचा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पात सामान्य नोकरदारवर्गाला जो दिलासा मिळालाय, त्याचे वर्णन अभूतपूर्व असेच करावे लागेल. १२ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर संपूर्ण करमुक्ती मिळाल्याने आता घराघरात लक्ष्मीची पावले उमटल्याशिवाय राहणार नाहीत.

**-एकनाथ शिंदे**, उपमुख्यमंत्री

“ शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, युवक, विद्यार्थी, सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून सादर केलेल्या अर्थसंकल्पातून देशातल्या प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी, प्रत्येक समाजघटकाला बळ मिळणार आहे. देशाला आर्थिक महासत्ता आणि विकसित राष्ट्र बनण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून महाराष्ट्राच्या पायाभूत विकासाला ताकद मिळणार आहे.

**-अजित पवार**, उपमुख्यमंत्री

## शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान धनधान्य योजना



देशाच्या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये पंतप्रधान धनधान्य योजनेचा समावेश आहे. राज्य सरकारांच्या मदतीने ही योजना देशभरातील १०० जिल्ह्यांमध्ये राबवली जाणार आहे. या योजनेचा १.७ कोटी शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होईल. शेतकऱ्यांसाठी दुसरी आनंदवार्ता म्हणजे किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीन लाखांवरून पाच लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे. याशिवाय दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालनासाठी पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज तसेच कापूस व्यवसायाला चालना देण्याचे जाहीर करण्यात आले आहे.

## महिलांकरिता मोठ्या संधी



सरकार पहिल्यांदा एससी आणि एसटीच्या पाच लाख नव्या लघुउद्योजक महिला घडवण्यासाठी दोन कोटी रुपये मुदतीचे कर्ज देणार आहे. कोणत्याही अटींशिवाय हे कर्ज मिळणार असून त्यावर त्यांना छोट्या आणि मध्यम आकाराचा व्यवसाय सुरू करता येणार आहे तसेच महिलांना स्टार्टअप्ससाठी सरकार १० हजार कोटी रुपयांचा निधी देणार आहे. इंडिया पोस्ट महिला बँकेचे पुनरुज्जीवन केले जाणार आहे. याशिवाय महिलांना उद्योग वाढवण्यासाठी डिजिटल ट्रेनिंग, मार्केटिंग सपोर्ट आणि सरकारी योजनांची जोडण्याची संधी दिली जाणार आहे.

## आरोग्य क्षेत्रावर विशेष भर

अर्थसंकल्पामध्ये उत्तम आरोग्यव्यवस्था पुरवण्यावर विशेष भर देणार आला आहे. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये २०० डे केअर सेंटर उघडले जातील; त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यामध्ये कॅन्सर सेंटर सुरू केली जाणार आहेत. विशेष म्हणजे जीवनरक्षक औषधांच्या किमती कमी होतील, ज्यामध्ये ३६ औषधांचा समावेश आहे.

## एआयसाठी ५०० कोटींची तरतूद

केंद्रीय अर्थसंकल्पात देशभरात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ची केंद्र स्थापन करण्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट एआय संशोधन, विकास आणि नवोपक्रमाला चालना देणे आहे, ज्यामुळे भारताला जागतिक एआय तंत्रज्ञानात क्षेत्रात स्थान मिळेल. याचबरोबर सरकार उद्योग, स्टार्टअप आणि शैक्षणिक संस्थांना पाठिंबा देण्यासाठी प्रगत एआय हब स्थापन करण्याची योजना आखत आहे.



“ मध्यमवर्गीय देशवासीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा हा विश्वसनीय अर्थसंकल्प आहे. हे सामान्यांचा विचार करणारे आपले सरकार असल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पातून अधोरेखित होते.

**-प्रशांत ठाकूर**, आमदार, पनवेल



## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून पनवेल रेल्वेस्थानकात पाहणी

### विविध कामांचा घेतला आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वेस्थानक परिसरात सध्या नवीन रेल्वे ट्रॅक, पार्किंग आणि प्लॅटफॉर्मवरील विविध कामे सुरू आहेत. या कामांची आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. ३१) पाहणी करून आढावा घेतला.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, स्टेशन मास्तर कृष्णा अग्रवाल, आर.के. नायर, शिवाजी भोसले, अशोक आंबेकर, जरीना शेख, कविता गुप्ता, रवींद्र फास्टे हेही उपस्थित होते.

अमृत भारत स्टेशन योजना (एबीएसएस) अंतर्गत प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रेल्वेस्थानकांचे आधुनिकीकरण केले जात आहे. पनवेल रेल्वेस्थानकाचा विकास या योजनेचा एक भाग असून प्रवाशांना जास्तीत जास्त सेवा मिळाल्या पाहिजेत या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाहणी करत आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

## 'महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मार्च महिन्यात सादर होणार'



**मुंबई : प्रतिनिधी**

देशाचा अर्थसंकल्प सादर झाला. आता महाराष्ट्राचा अर्थसंकल्प कधी सादर होणार याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे. पवार हे राज्याचे अर्थमंत्री असून तेच अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

'मार्चच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहे. शेतकरी आणि सर्वसामान्य यांचा विचार करून अर्थसंकल्प मांडणार आहे. लाडक्या बहिणींचाही विचार करणार आहे तसेच तरुण-तरुणींना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रम घेत आहे,' असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

### कुंभमेळ्याहून परतणाऱ्या रत्नागिरीतील भाविकांच्या गाडीला अपघात

## तिघांचा जागीच मृत्यू, तर एक गंभीर जखमी

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

कुंभमेळ्याला गेलेल्या रत्नागिरीतील भाविकांच्या गाडीला शनिवारी (दि. १) पहाटे ४च्या सुमारास नाशिक जिल्ह्यातील सिन्नरजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला असून एकाची प्रकृती गंभीर आहे.

रत्नागिरीतील सात भाविक कुंभमेळ्यातील शाही स्नान आटोपून इनोव्हा गाडीने रत्नागिरीला परत येत होते. या वेळी समोरून येणाऱ्या डंपरने गाडीला जोरात धडक दिली.




यामध्ये मंगलमूर्ती प्रतिष्ठानचे माजी सरचिटणीस व निवृत्त प्राचार्य प्रताप सावंत देसाई, वाहनचालक भगवान झगडे या दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर प्रसिद्ध ऑडीटर अक्षय निकम यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर काही वेळाने त्यांचा मृत्यू झाला. महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी थांबून अपघातग्रस्तांना सहाय्य केले.

अपघातग्रस्त इनोव्हा गाडीत निवृत्त शिक्षक रमाकांत पांचाळ, श्रीराम मंदिराचे विश्वस्त संतोष रेडीज, किरण निकम व नातेवाईक प्रांजल साळवी हेही प्रवास करीत होते. सातपैकी तिघांचा मृत्यू झाला, तर इतर तिघे जखमी झाले. यातील किरण निकम यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

## रायगडात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात शनिवारी (दि.१) माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा झाला. जिल्ह्यातील गणपती मंदिरांमध्ये दर्शनासाठी गणेशभक्तांनी गर्दी केली होती. गणेश जयंतीनिमित्त गणपती मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वत्र गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष झाला.

पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरांबाहेर दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. काकड आरतीने उत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर पूजापाठ, महाआरती, भजन, कीर्तन असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. काही गणेशोत्सव मंडळांनी रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर असे सामाजिक उपक्रमदेखील राबवले.

काही ठिकाणी सायंकाळी श्रींची पालखी मिरवणूक काढण्यात आली. गावोगावच्या मंदिरांमध्ये दिवसभर उत्साहाचे वातावरण होते. शहरी भागातील मंडळे, सोसायट्यांमध्येदेखील माघी गणेशोत्सव साजरा करण्यात आला. महिलांसाठी हळदीकुंकू, विविध खेळ तसेच लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम रंगले.

अष्टविनायकांपैकी पालीचा बल्लाळेश्वर आणि महडचा वरदविनायक ही दोन स्थळे रायगड जिल्ह्यात आहेत. तेथील गणेश मंदिरे भाविकांनी अक्षरशः फुलून गेली होती. याशिवाय मुरूड तालुक्यातील नांदगाव येथील सिद्धिविनायक, उरण चिरनेरचा महागणपती, कडावचा बालदिगंबर, सुधागड जांभुळपाडा येथील सिद्धीगणेश, माणगाव मुगवलीचा स्वयंभू गणेश अशा प्रमुख मंदिरांमध्येही भविकांची दर्शनासाठी गर्दी दिसून आली.





### कुलाबा किल्ल्यात भाविकांची गर्दी

*अलिबागच्या कुलाबा किल्ल्यातील ऐतिहासिक आंग्रेकालीन गणपती मंदिरात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी समुद्राला भरती येण्यापूर्वीच सकाळी लवकर दर्शन घेणे पसंत केले. संध्याकाळी पुन्हा ओहोटीच्या वेळी मंदिरात गर्दी झाली होती. भाविकांसाठी मोफत बोट उपलब्ध करून देण्यात आली होती. पुरातन वास्तूमध्ये स्थानिक उत्सवाच्या वेळी देशातील २० ठिकाणी केंद्र सरकारने प्रवेश शुल्क माफ केले होते. त्याचप्रमाणे अलिबाग येथील कुलाबा किल्ल्यातील माघी गणेशोत्सवासाठी येणाऱ्या भक्तांनाही प्रवेश शुल्क माफ करण्यात आले.*

# एआय विद्यापीठ स्थापनेसाठी टास्क फोर्सची नियुक्ती

## माहिती तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

देशभरातील पहिले ए आय विद्यापीठ महाराष्ट्रात स्थापन होत आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सहयोगाने माहिती तंत्रज्ञान विभागगाने या कामी पुढाकार घेतला असून आज त्याबाबतच्या टास्क फोर्सची नियुक्ती करण्यात आली, अशी माहिती राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली.



महाराष्ट्रामध्ये संशोधन, विकास, कौशल्यवृद्धी, तंत्रज्ञान नवकल्पना आणि धोरण निर्मितीला चालना देण्यासाठी आणि भारत सरकारशी समन्वय साधून जागतिक पातळीवरील उत्कृष्टता व नाविण्यतेचे केंद्र तयार करण्यासाठी टास्कफोर्सची नियुक्ती करण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचे शिक्षण देणारे विद्यापीठ तयार करण्याबाबत नियोजन करण्याची जबाबदारी स्थापन करण्यात आलेल्या टास्कफोर्सची असेल आणि त्याबाबतचा शासन निर्णय आज सरकारमार्फत जाहीर करण्यात आला.

भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात सांगितल्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार यांनी ही संकल्पना पुर्ण करण्यात आघाडी घेतली असून याबाबत दोन बैठका घेऊन तातडीने टाक्स फोर्स नियुक्ती करुन या कामाला मुर्त स्वरूप दिले आहे. उत्कृष्टता व नाविन्यतेचे केंद्र असलेल्या एआय महाविद्यालया संबंधित नियोजनासाठी टास्क फोर्समध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल

प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान यांच्या अध्यक्षतेखाली पुढील सदस्यांची टास्कफोर्स समिती नेमण्यात आली आहे. या टास्कफोर्समध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे प्रधान सचिव, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, भारतीय तंत्रज्ञान संस्था(IIT) पवई, मुंबईचे संचालक, भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM²) मुंबईचे संचालक, नेरकॉमचे प्रतिनिधी, एआय चेप्रतिनिधी, ईलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार येथील वरिष्ठ दर्जाचे अधिकारी राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, नॅशनल इन्स्टिटच्युट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, संभाजीनगर चे कार्यकारी संचालक, ब्रम्हा रिसर्च फाउंडेशन, मुंबईचे प्रतिनिधी, प्रमुख एआय गुगल इंडियाचे प्रतिनिधी नरेन कचरु, एआय डीवीजन महिंद्रा ग्रुपचे सीइओ भुवन लोढा, ॲटलस स्किलटेक विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजन वेळूकर, क्यूएनयू लॅब्जचे सीईओ, डेटा सिक्युरीटी कौन्सिल ऑफ इंडियाचे सिईओ, विनायक गोडसे, इंडियन नेव्ही प्रतिनिधी, माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडचे सीएमडी, एलॲण्डटीचे प्रतिनिधी आणि माहिती तंत्रज्ञान संचालनालय मुंबईचे कक्ष अधिकारी यांचा समावेश असेल.

# ग्रामीण भारताचा चेहरामोहरा बदलणारा अर्थसंकल्प –मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**



देशातील मध्यमवर्गासाठी स्वप्नवत अर्थसंकल्प आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केला आणि १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करुन एक मोठा दिलासा मध्यमवर्गाला दिला. ग्रामीण भारताचा चेहरामोहरा बदलणारा आणि नागरिककेंद्रीत गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारा हा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

हा अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने नेणारा, सर्वसमावेशक आणि विकसित भारताचा ऐतिहासिक अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प अर्थव्यवस्थेला अधिक प्रगल्भ करणारा ठरेल. अर्थव्यवस्थेला आणखी सदृढ करणारा, मध्यमवर्गीय, पगारदार, युवा आणि शेतकरी, कष्टकरी या सगळ्यांना दिलासा देणारा आहे. या अर्थसंकल्पातील तरतुदींमुळे महाराष्ट्राच्या अनेक महतत्त्वाकांक्षी धोरणांना बळ मिळेल. विशेषत: महाराष्ट्र हे स्टार्टअपचे कॅपिटल असल्याने नवीन धोरणांचा मोठा लाभ मिळेल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

प्राप्तीकराची मर्यादा वाढविल्याने तो पैसा अर्थव्यवस्थेत येईल आणि त्यामुळे मागणी वाढेल. करपात्र उत्पन्नाची मर्यादा ७ वरून १२ लाख करणे हा निर्णय ऐतिहासिक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातच ही मर्यादा अडीच लाखांवरून सात लाख करण्यात आली होती. ती आता १२ लाख करण्यात आली. हा प्रवास निश्चितच भारतीय अर्थव्यवस्थेसाठी परिणामकारक आहे. यातून मध्यमवर्गीय, पगारदार, युवक यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

एका मोठ्या वर्गाच्या हाती उत्पन्नाचा मोठा वाटा राहणार आहे. ज्यामुळे बाजारपेठांत चैतन्य निर्माण होईल. खरेदी वाढेल, मागणी वाढेल, उत्पादन वाढेल, रोजगार वाढतील विशेषत: एमएसएमई क्षेत्राला चालना मिळेल. यातून अर्थव्यवस्था आणखी बळकट होण्यास मदत होईल. या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठींही महत्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. देशातील १०० जिल्ह्यांसाठी विशेष प्रोत्साहन योजना, तेलबिया उत्पादनाला प्रोत्साहन, यात शंभर टक्के माल खरेदीचे धोरण यामुळे शेतकर्यांसाठी एक मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. मच्छिमारांना आता ५ लाखांपर्यंतचे कर्ज बिनव्याजी मिळणार आहे. यातून त्यांना व्यवसायवाढीसाठी प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा आहे. कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढेल, अशा निर्णयामुळे शेती आणि शेतकर्यांसाठी नव्या संधी निर्माण होणार आहेत, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

युवा उद्योजकांसाठी एमएसएमई क्षेत्र महत्वाचे आहे. त्यांच्यासाठी कर्ज मर्यादा आणि वारंवारतेचा निकष वाढविण्याच्या निर्णय महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र ही स्टार्टअपची राजधानी आहे. स्टार्टअपसाठी २० कोटी रूपयांची कर्ज मर्यादा करण्यात आली आहे. यामुळे स्टार्टअपची इकोसिस्टिम मजबूत होणार आहे. वेगवेगळे स्टार्टअप आणि त्यामाध्यमातून होणार्या रोजगार संधी यामुळे आपल्या राज्याची या क्षेत्रातील वाटचाल आणखी दमदार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

पायाभूत प्रकल्पांच्या विकासाकरिता नवीन इन्फ्रास्ट्रक्चर धोरण तयार करण्यात येत आहे. पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी राज्यांना ५० वर्षे बिनव्याजी कर्ज योजनेचाही राज्याला सर्वाधिक फायदा झाला आहे आणि या अर्थसंकल्पातही त्या बाबतीत राज्य पुढे असेल. पीपीपी प्रकल्पांमुळे खाजगी क्षेत्रच्या गुंतवणूकीला प्रोत्साहन वाढेल मुख्यमंत्र्यांनी नमूद केले आहे

# पाली नगरपंचायतीच्या विषय सभापतींची निवड

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली नगर पंचायतीतीच्या बांधकाम सभापती पदी सुलतान बेणसेकर यांची निवड करण्यात आली आहे. याचबरोबर महिला बालकल्याण सभापतीपदी प्रितीजा जोशी तर पाणीपुरवठा सभापतीपदी प्रतीक्षा पालांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीनंतर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.







सुलतान बेणसेकर हे सर्वसामान्य जनतेच्या सतत संपर्कात असतात. त्याचबरोबर आपल्या प्रभागात ही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या कोणत्याही पद व जबाबदारीला त्यांनी योग्य न्याय दिला आहे तसेच नव्याने मिळालेली बांधकाम सभापती पदाची जबाबदारी प्रामाणिकपणे व कर्तव्ये निष्ठतेने पार पडणार असल्याची ग्वाही सुलतान बेणसेकर यांनी दिली. या पदाच्या माध्यमातून अधिकाधिक विकासामुख लोकोपयोगी कामे मार्गी लावणार असल्याचे सांगितले महिला बालकल्याण सभापती प्रितीजा जोशी व पाणी पुरवठा सभापती प्रतीक्षा पालांडे यांनी मिळालेल्या पदाचा उपयोग जनतेला अपेक्षित असलेली कामे मार्गी लावण्यासाठी केला जाईल, असे सांगितले

## हंड्रेड डेज कृती कार्यक्रमाचा प्रभाव

**मुरुड : प्रतिनिधी**

वळके समूह साधनकेंद्रात जानेवारी महिन्याची शिक्षण परिषद गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. यावेळी केंद्रप्रमुख महेश कवळे यांनी शासनाच्या बहुचर्चित हंड्रेड डेज कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी कशाप्रकारे करावयाची याचे सविस्तर मार्गदर्शन केले. दस्तावेज अद्ययावत करण्याच्या सूचना दिल्या

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी स्टुडंट ऑफ रोड सेफ्टी अभियान उपयुक्त -मंत्री आदिती तटकरे

## सुरक्षा गुणांकन प्राप्त विद्यार्थी, शिक्षकांचा गौरव

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शालेय विद्यार्थ्यांना जागरूक, आदर्श आणि सक्षम नागरिक बनण्याच्या दृष्टीने माझी शाळा– सुरक्षित शाळा अंतर्गत राबविण्यात आलेला स्टुडंट ऑफ रोड सेफ्टी हा उपक्रम अत्यंत स्तुत्य व उपयुक्त आहे. हा उपक्रम गृह विभाग आणि शालेय शिक्षण विभाग यांच्या मार्फत राज्यातील सर्व शाळांमध्ये संयुक्तरित्या राबविण्यासाठी शासनस्तरावरून विशेष प्रयत्न करण्यात येतील असे प्रतिपादन महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी केले.

रस्ता सुरक्षा सप्ताह २०२५ अंतर्गत रायगड जिल्हा पोलीस यांच्या वतीने माझी शाळा सुरक्षित शाळा अंतर्गत सुरक्षित शाळा व स्टुडंट ऑफ रोड सेफ्टी पारितोषिक वितरण समारंभ सोहळा २०२५ चे आयोजन बालगंधर्व रंगभवन, रिलायन्स टाऊनशिप, नागोठणे येथे करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते आदींसह विविध शाळेचे विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रायगड पोलीस दलाकडून १ जानेवारी पासून सुरक्षाविषयक वेगवेगळ्या प्रकारचे अतिशय स्तुत्य उपक्रम यशस्वीपणे राबविले जात आहेत. त्याबद्दल पोलीस दलाचे विशेष अभिनंदन करून तटकरे म्हणाल्या माझी शाळा , सुरक्षित शाळा या उपक्रमाअंतर्गत सुरक्षेविषयक जनजागृती व प्रबोधन कार्यक्रमात शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनिंना समाविष्ट करून घेण्यात आले ही अतिशय महत्वपूर्ण गोष्ट आहे. शालेय अभ्यासक्रमा बरोबरच विद्यार्थ्यांना सुरक्षेचे धडे दिले जात आहेत. यामुळे हे विद्यार्थी याबाबत दक्ष व जागरूक राहतील.

या अभियानात ५०० शाळांचे सर्वेक्षण करून त्यापैकी २८ शाळांची निवड करून त्यांना सुरक्षेच्या साठी सन्मानित करण्यात आले आहे. एकूणच शाळांच्या दृष्टीने ही बाब महत्वपूर्ण आहे. प्रत्येक पालकांच्या शालेय व्यवस्थापनाकडून माझा पाल्य सुरक्षित असला पाहिजे ही अपेक्षा असते. या उपक्रमामुळे शाळांचे सुरक्षा मूल्यांकन वाढले आहे .जिल्ह्यातील सर्व शाळांनी सुरक्षेच्या बाबतीत आवश्यक ते नियम पाळून गुणांकन मिळवून आपली शाळा सुरक्षितअसल्याचे सिद्ध करावे असे आवाहन. तटकरे यांनी यावेळी केले.

रायगड पोलीस दलाच्यावतीने राबविण्यात आलेला हा उपक्रम राज्यस्तरीय करण्यासाठी देखील प्रयत्न करण्यात येतील असेही तटकरे यांनी सांगितले.पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या उपक्रमाबद्दल रायगड पोलीस दलाचे अभिनंदन केले.

या वेळी मंत्री तटकरे यांच्या हस्ते सुरक्षा गुणांकन प्राप्त २८ शाळेतील विद्यार्थी, शिक्षकांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले. रस्ता सुरक्षा अभियानातर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाला विविध शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, पालक उपस्थित होते.

## माणगाव ग्रामीण पतसंस्थेचा वर्धापन दिन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.,उतेखोल ता.माणगाव या पतसंस्थेचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन सोहळा शनिवार (दि.१ ) रोजी संस्था कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या हळदी – कुंकू कार्यक्रमास मोठ्यासंख्येने महिलांनी उपस्थित राहून हळदी कुंकू समारंभाचा आनंद लुटला.

वर्धापन दिनानिमित्त सत्यनारायणाची महापूजा संस्थेतर्फे आयोजित करण्यात आली होती.संस्थेच्या भागधारक,खातेदार,हितचिंतक व मित्रपरिवार यांच्यासह माणगावकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. संस्थेचे चेअरमन आनंदशेठ यादव व सहकाऱ्यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

सदर वर्धापन दिनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संस्थेचे चेअरमन आनंदशेठ यादव,व्हाईस चेअरमन मदनलाल जैन सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड,सर्व कर्मचारी वृंद व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गुरेचोरांचा पाठलाग करून दोन जणांना केली अटक

## पेण पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाची कारवाई

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील जुन्या आरटीओ ऑफिस समोर राहणारे दुग्ध व्यावसायिक प्रकाश शिंगरुत यांच्या गुरांमधील एका बैलाची तीन महिन्यांपूर्वी चोरी करुन कत्तल करण्याचा प्रकार घडला होता. या प्रकरणातील फरार झालेलेदोन आरोपी इस्माईल शम्सी उर्फ गोरु व अशफी डॅनियल मद्दु उर्फ एचपी यांना पेण पोलीसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ताब्यात घेत अटक केली

अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींची चौकशी केली असता मुख्य आरोपी कल्याणचा इब्राहिम इस्माईल मजीद उर्फ पापा हड्डी असल्याचे नाव समजुन आल्याने पोलीस पथक त्याच्या मागावर होते. मात्र अनेक दिवस तो पोलिसांना हुलकावणी देत होता अखेर पेण पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्या आदेशाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उप निरीक्षक समद बेग, उप निरीक्षक प्रतिक पोकळे व पोलीस पथकाने गोपनिय माहीतीच्या व तांत्रीक बाबींच्या आधारे शोध घेतला.



इगतपुरी पोलिसांच्या मदतीने समृद्धी महामार्गाने कल्याणच्या दिशेकडे निघाल्याची खात्री झाल्याने तपास पथक इगतपुरी टोलनाक्याचे दिशेने रवाना होत रात्री २ वाजन्याच्या सुमारास इगतपुरी टोलनाका येथे स्थानिक पोलिसांच्या मदतीने नाका बंदी करून ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला परंतु आरोपी यांनी टोल नाक्यावर ट्राफिक जाम केल्याचे पाहून त्यांना संशय आला. त्यांनी उलट दिशेने गाडी फिरवून पळून जाण्याचा प्रयत्न केला असता पथकाने त्याचा थरारक पाठलाग करून त्याला अत्यंत कौशल्याने अटक करण्यात आली आहे.

# देशाच्या आर्थिक उलाढालीत पतसंस्थांचा सहभाग वाढला पाहिजे –डॉ. उदय जोशी

**अलिबाग : प्रतिनिधी**

देशाच्या एकूण आर्थिक उलाढालीत पतसंस्थांचा सहभाग वाढला पाहिजे . देशात पतसंस्थांबात अविश्वासाचे वातावरण आहे ,ते बदलण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांनी अलिबागमध्ये पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केले.



आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त शुक्रवारी (दि. ३१) अलिबागमध्ये सहकारदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. त्यापूर्वी आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलैल्या पत्रकार परिषदेत डॉ. उदय जोशी बोलत होते. महाराष्ट्र राज्य पतसंस्थांच्या महासंघाचे सहसचिव शरद जाधव, रायगड जिल्हा सहकारी संस्था उपनिबंधक प्रमोद जगताप, सहाय्यक निबंधक श्रीकांत पाटील, महाराष्ट्र राज्य पतसंस्थांच्या महासंघाचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील, महाराष्ट्र राज्य पतसंस्थांच्या महासंघाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे , कोकण विभाग पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे या वेळी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य पतसंस्थांचा महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे व्हीडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून या पत्रकारपरिषदेत सहभागी झाले होते.

देशात १ लाख १० हजार सहकारी पतसंस्था आहेत. १ लाख १० हजार कोटींच्या ठेवी आहेत. ७० हजार कोटींचे कर्जवाटप करण्यात आले आहे. ४५ हजार कोटींचा स्वनिधी आहे. देशाच्या आर्थिक उलाढलीत ही रक्कम एक ते दीड टक्क आहे. ती नगण्य आहे. त्यामुळे देशाच्या अर्थिक उलाढालीत पतसंस्थांचा हसभाग वाढवाल पाहिजे, असे डॉ. उदय जोशी म्हाणाले.

मागील काही वर्षामध्ये सहकारात नैराश्येचे वातवावरण आहे. या सहकारदिंडीमध्ये महिला , युवक सहभागी होत आहेत. या सहकारदिंडीमुळे सहकारातील कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण होईल. उत्सहाचे वातवरण तयार होईल, असे काका कोयटे म्हणाले.

यंदाचे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्यानिमित्ताने कार्यक्रम आयोजित केले जात आहे. यामुळे सहकार वाढीस मदत होईल. काही सुधारणा होतील, असे गिरीश तुळपुळे म्हणाले. सुरेश पाटील यांनी आभारप्रदर्शन केले.

सकाळी अलिबाग शहरात सहकार दिंडी काढण्यात आली. या दिंडीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. शहरात सहकाराचे ध्वज लावण्यात आले होते. स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या.

# अनैतिक संबंधाच्या संशयातून प्रियकराने केली प्रेयसीची हत्या

**पनवेल : वार्ताहर**

दुसऱ्यासोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून प्रियकराने २२ वर्षीय प्रेयसीवर धारधार शस्त्राने वार करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना नवीन पनवेल सेक्टर १८मध्ये घडल्याचे समोर आली आहे. प्रेयसीवर हल्ला केल्यानंतर प्रियकराने स्वतःवर वार करून स्वतःलादेखील संपवण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात आरोपी प्रियकराविरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

या विषयी अधिक माहिती अशी की, जागृती हरेश सत्वे (वय २२) असे हत्या झालेल्या तरुणीचे नाव आहे. जागृती ही तिच्या कुटुंबासोबत नवीन पनवेल सेक्टर १८ येथे राहत होती. जागृती हिचे निलेश सुधाकर शिंदे (वय २५, रा. देवगाव ठाणा) याच्यासोबत प्रेमसंबंध होते. गेल्या तीन महिन्यापूर्वी दोघांच्या प्रेमसंबंधात तणाव निर्माण झाला होता. त्यांचा ब्रेकअपदेखील झाला होता, मात्र यानंतरही दोघांमध्ये वारंवार वाद होऊ लागले होते.

आपल्या प्रेयसीचे दुसऱ्या मुलासोबत प्रेमसंबंध असल्याचा संशय निलेश याच्या डोक्यात वारंवार येत होता. या गोष्टीचा राग मनात धरून निलेशने ३१ जानेवारी रोजी प्रेयसीचे घर गाठले आणि जागृतीला शिवीगाळ करत तू दुसऱ्यासोबत प्रेमसंबंध ठेवू नको असे बोलून तिला मारहाण केली. त्यानंतर संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास तिच्या घरी जाऊन जागृतीला मारहाण करत तिच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करत तिला ठार केले.

यानंतर निलेशने स्वतःला संपवण्यासाठी स्वतःवरदेखील वार केले. या वेळी जागृतीची आई आणि बहीण ही घरी होती. अतिरक्तस्राव झाल्याने जागृती जागेवर मृत पावली आणि निलेशला उपचारासाठी कामोठे एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

गुन्हे

## घरातील चोरीत लाखो रुपये किमतीचा ऐवज लंपास

**पनवेल :** करंजाडे येथील एका घरातून अज्ञात व्यक्तीने जवळपास ५ लाख ६० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची घटना घडली आहे. धनवंतरी भरुड यांच्या जोमा केणी रेसिडेन्सी येथून अज्ञात चोरट्याने त्यांच्या संमतीशिवाय त्यांच्या घरातील सोन्याचा हार, मंगळसूत्र, कानातील कुडी, साखळी, अंगठी असा मिळून जवळपास ५ लाख ६० रुपये इतकीचा ऐवज त्यांच्या संमतीशिवाय चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# प्रयोगशाळा सहाय्यक व विज्ञान शिक्षकांकरिता प्रशिक्षण कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



मराठी विज्ञान परिषद, शिक्षण विभाग उपसंचालक कार्यालय मुंबई विभाग, शिक्षणाधिकारी पनवेल महानगरपालिका आणि मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'प्रयोगशाळा साहाय्यक व विज्ञान शिक्षकांकरिता प्रशिक्षण' कार्यशाळेचे आयोजन दिनांक २९ ते ३१ जानेवारी या कालावधीत दि. बा. पाटील महानगरपालिका शाळा पनवेल येथे करण्यात आल होते

या वेळी मराठी विज्ञान परिषदेच्या प्रमुख मार्गदर्शकांनी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रयोग कसे करून दाखवावे, प्रयोगाची पुर्व तयारी, प्रयोगांचे उद्देश, परिचरांचे काम याबाबत कार्यशाळेत मार्गदर्शन केले. यावेळी प्रात्यक्षिकासह प्रयोग उपस्थित शिक्षकांना करून दाखविण्यात आले. या कार्यशाळेत ४० शिक्षकांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेत मराठी विज्ञान परिषदेचे राजेश समेळ, चारुशीला जुईकर, अनघा वक्टे व अभय यावलकर यांनी मार्गदर्शन केले.पनवेल महानगर पालिकेच्यावतीने रायगड जिल्ह्यात प्रथमतः अशा पध्दतीच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी या कार्यशाळेच्या आयोजनाकरिता खुप मेहनत घेतली.



**पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आयोजित धारातीर्थ गडकोट मोहीम २०२५ वीर तानाजी मालुसरे समाधीस्थळ उमरठ ते रायगडमार्गे मुरारबाजी देशपांडे समाधी अशी रायगड जिल्ह्यात असून ७ फेब्रुवारी रोजी तानाजी मालुसरे यांच्या उमरठ येथील समाधीपासून चालू होईल व ११ फेब्रुवारी रोजी रायगड येथे मोहिमेचा समारोप होईल. या मोहिमेचे औचित्य साधून श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या पनवेल तालुक्यातील धारकऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना आमंत्रण दिले. या वेळी गडकोट मोहिमेस येण्याचे आश्वासन प्रशांतदादांनी धारकऱ्यांना दिले. या धारातीर्थ गडकोट मोहिमेला देशभरातील पाच राज्यातून लाखोच्या संख्येने धारकरी सहभागी होत असतात. यंदा हा मान रायगडला मिळाला आहे.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि.३१) पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी.गडदे, कार्यकारी संचालक वर्षा ठाकूर, संजय भगत, घनश्यामदास सराफ कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स मालाड मुंबईचे माजी प्राचार्य, सीए डॉ. जयंत आपटे, रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे, उच्च माध्यमिक विद्यालय मुख्याध्यापिका निशा नायर, रामशेठ ठाकूर महाविद्यालय सीडीसी मेंबर प्रवीण पाटील, प्रभाकर जोशी, दीपक शिंदे, भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, तपासे सर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले व त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली, विद्यार्थ्यांनी नृत्ये व गीते सादर केली.

कार्यक्रमासाठी नमिता आखूरे व सुजन शंकर मिश्रा यांनी परीक्षक म्हणून भूमिका बजावली. सूत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे, प्रा. नीलम मोरे, प्रा. शुभम शर्मा व विद्यार्थ्यांनी केले. सर्वांचे आभार डॉ. दीपिका हसीजा यांनी मानले.

## चिखले येथे माजी विद्यार्थ्यांची शाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील चिखले येथील रायगड जिल्हा परिषद शाळेमध्ये पहिल्यांदाच १९ वर्षांनंतर माजी विद्यार्थी, माजी शिक्षक, माजी केंद्रप्रमुख यांच्या उपस्थितीत स्नेहमेळावा मंगळवारी (दि.२८) आयोजित करण्यात आला होता.

माजी केंद्रप्रमुख श्रीकांत ठाकूर, माजी मुख्याध्यापक विष्णू पाटील, माजी प्र. मुख्याध्यापिका म्हात्रे, शहासने, शाळेचे माजी शिक्षक परांजपे, लोहोकळे, मोरे, गोरे, शाळेच्या मुख्याध्यापिका दळवी, जाधव, गायकवाड, पवार यांच्या उपस्थितीत माजी विद्यार्थी व माजी शिक्षक यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र शिर्के यांनी केले तर आभार प्रदर्शन करिष्मा पाटील, पूजा पाटील यांनी केले. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकाबरोबर आपले केंद्रप्रमुख यांनाही बोलवले होते.





**पनवेल : सुकापूर येथील जगदीश पोपेटा यांच्या डेअरीचे उद्घाटन भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, पाली देवद (सुकापूर) ग्रामपंचायत सरपंच योगिता पाटील, आकुर्ली ग्रामपंचायतीचे सरपंच सचिन पाटील, युवा मोर्चा तालुका चिटणीस यतीन पाटील, रायगड जिल्हा उपाध्यक्ष महेश पाटील युवा मोर्चा रायगड जिल्हा उपाध्यक्ष व सुकापूर ग्रामपंचायत सदस्य, भाजप सुकापूर गाव अध्यक्ष राजेश पाटील, माजी उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य अशोक पाटील, युवा मोर्चा उपाध्यक्ष राहुल पाटील, बूथ अध्यक्ष प्रमोद पोपेटा, युवा नेते प्रवीण पोपेटा आदी उपस्थित होते.**

# कळंबोलीत पर्यावरणस्नेही हळदीकुंकू!

## आशीर्वाद सोसायटीत संक्रांतीचे वाण म्हणून तुळशीचे रोप भेट



**पनवेल, कळंबोली : वार्ताहर**

कळंबोली सेक्टर १४ येथील आशीर्वाद सोसायटीमध्येही शनिवारी सुहासिनींच्या जिव्हाळ्याचा हळदीकुंकू उपक्रम पार पडला. विशेष म्हणजे या वेळी सहभागी झालेल्या महिला भगिनींना संक्रांत वाण म्हणून तुळशीचे रोप देऊन एक प्रकारे पर्यावरण स्नेही संदेश देण्यात आला.

नवीन वर्षाच्या सुरुवातीला येणारा पहिला सण मकरसंक्रांत होय. सुगड पुजण्यापासून पुढील १५ दिवस हळदी कुंकवाचे कार्यक्रम सुरू होतात, पण सगळ्याच महिलांना उत्सुकता असते की, हळदी कुंकवाला वाण म्हणून कोणती वस्तू मिळणार. यासाठी आयोजकांच्या वतीने वेगवेगळे पर्याय शोधले जातात. कळंबोलीतील आशीर्वाद सोसायटीच्या महिला आयोजकांनी हळदी कुंकू समारंभामध्ये सहभागी झालेल्या सुहासिनींना तुळशीचे रोप देऊन 'झाडे लावा झाडे जगवा' हा एक पर्यावरणपूरक संदेश दिला.

तुळशीचे रोप भारतात जवळपास प्रत्येक घरात आढळते. ग्रामीण भागामध्ये तर घरासमोर तुळशी वृंदावन असते. या पवित्र वनस्पतीला संस्कृतीत, आयुर्वेदातही खूप महत्त्व आहे तुळशीला त्याच्या असंख्य आरोग्य फायद्यांसाठी औषधी वनस्पतींची राणी म्हणून ओळखले जाते. या पार्श्वभूमीवर आम्ही हळदीकुंकू समारंभामध्ये तुळशीचे रोप वाण म्हणून दिले असल्याचे आशीर्वाद सोसायटीतील महिला सदस्यांनी सांगितले.



**पनवेल : चेन्नई येथे पार पडलेल्या इंडियन नॅशनल ऑटोक्रॉस चॅम्पियनशिप २०२४ कार रेसिंग स्पर्धेत नवीन पनवेलमधील कुशल (बंटी) सुरेश चौधरी याने दोन्ही फायनल राऊंड मध्ये संपूर्ण भारतातून पहिला येण्याचा मान पटकावून पनवेलचा नावलौकिक भारतभर केला. याबद्दल त्यांचे घरी जाऊन अभिनंदन करताना माजी नगरसेवक तथा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते. सोबत कुशल चौधरी यांचे वडील सुरेश चौधरी, भाऊ विशाल चौधरी आणि कल्पेश चौधरी.**

# इमॅन्युएल मिशन स्कूलचे स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




नवीन पनवेलमधील इमॅन्युएल मिशन स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात उत्साहात साजरे झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्नेहसंमेलनाला भेट देत शुभेच्छा दिल्या.

स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक समीर ठाकूर यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, अमन अख्तर, मुख्याध्यापिका नाझनीन पालेकर, झाकीर पालेकर, सुहा पालेकर, फारीस पालेकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.

# ज्येष्ठ रंगकर्मी धनाजी मुंबईकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर

**उरण : वार्ताहर**

ऐतिहासिक नाटकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेद्वारे रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ रंगकर्मी धनाजी काळू मुंबईकर यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्ताने मुंबईकर परिवारातर्फे गुरुवारी (दि.३०) जानेवारी रोजी चिरनेर जनरल हॉस्पिटल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नेरूळ नवी मुंबई येथील तेरणा रक्तपेढी, तेरणा हॉस्पिटल, तेरणा मेडिकल कॉलेजचे या शिबिराला सहकार्य लाभले. शिबिराचे उद्घाटन डॉ.सुधीर केणी यांच्या हस्ते करण्यात आले. अनेक मान्यवरांसह नाट्यसृष्टीच्या कलावंतांबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिबिरास भेटी देऊन, मुंबईकर यांचे अभिनय कौशल्य व संवाद फेक अप्रतिम असल्यामुळे, नेहमीच त्यांच्या वाट्याला आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिका दर्शकांच्या कायम लक्षात राहिल्या असल्याचा उल्लेख अनेकांनी त्यांना आदरांजली वाहताना केला.

या वेळी प्रगतशील शेतकरी तथा आंबा बागायतदार महेंद्र वसंत मोकल यांनी तालुक्यात होणाऱ्या रक्तदान शिबिरात ४० वेळा रक्तदान केल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे या शिबिरात मुंबईकर कुटुंबातील पंधरा रक्तदात्यांनी रक्तदान केले. एकूण ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले. प्रत्येक रक्तदात्याला भेटवस्तू देण्यात आली. राजेंद्र मुंबईकर, संजय मुंबईकर, रवींद्र मुंबईकर, अमित मुंबईकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. दत्ता राठोड, डॉ. केसरीनाथ भगत, डॉ. नितीन पाटील, डॉक्टर दीपा झालटे व डॉ. भाग्यश्री या वैद्यकीय टीमचे शिबिरास सहकार्य लाभले.





# कॅपिटॉल

## सव्वाशे वर्षांच्या या इमारतीत चित्रपटाच्या पडद्याला 97 वर्ष

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

चित्रपटसृष्टी, चित्रपटगृह, चित्रपटरसिक आणि विविध माध्यमांतून (मुद्रित माध्यम, उपग्रह वाहिन्या, डिजिटल माध्यम) होत असलेला चित्रपटासंदर्भातील प्रवास इस्टमनकलर असाच! कुठे आठवणींचा फ्लॅशबॅक, कुठे गीत संगीताचा मनसोक्त मनमुराद आस्वाद, कुठे सेलिब्रिटीजच्या (पूर्वी त्यांना कलाकार म्हणत हे पटतयं ना?) गॉसिप्स, ग्लॅमर, गप्पा गोष्टींचे आकर्षण. आणि यात एक भारी महत्त्वाचा फंडा चित्रपटगृहांचा! प्रेक्षकांपर्यंत चित्रपट कसा पोहचत आला हा एक वेगळाच प्रवास. आज तो मोबाईल, ओटीटीपर्यंत पोहचलाय. शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत चित्रपट पोहचतोय आणि त्यात काळानुसार बदल होताहेत. यात संदर्भ, माहिती, तपशील, गोष्टी, आठवणी, किस्से भरपूर.

असेच एक चित्रपटगृह कॅपिटॉल. मुंबईतील अतिशय मोक्याच्या ठिकाणचे. एखाद्या चित्रपटगृहातील जवळपास प्रत्येक शनिवारी दुपारी ३ व सायंकाळी ६चा शो हमखास हाऊसफुल्ल व्हायचाच असे मी तुम्हाला अगदी सुरुवातीलाच सांगितले तर तुमचे दोन प्रश्न असतील, असे वेगळेच वैशिष्ट्य असलेले चित्रपटगृह कोणते आणि हमखासपणे शनिवारी हाऊसफुल्ल गर्दी का होत असे?

असे चित्रपटगृह होते, हे कॅपिटॉल. रसिकांच्या किमान दोन पिढ्यांतील चित्रपट रसिकांसमोर एव्हाना हे थिएटर डोळ्यासमोर आले असेलच. दक्षिण मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलच्या (पूर्वीचे नाव व्हिक्टोरिया टर्मिनल. अर्थात व्ही.टी.) बरोबर समोर हे थिएटर आजही आहे, पण आता तेथील खेळ बंद होऊन काही वर्षे झाल्याने ती सव्वाशेपेक्षा जास्त वय वर्षांची इमारत निस्तेजपणे उभी आहे इतकेच. शांत असली तरी ती लक्ष वेधते. तेथून जाताना क्षणभर वाटते, तेथील पडद्यावर एकादा चित्रपट सुरू असावा आणि त्यातील एकादी डायलॉगबाजी, एखादे गाणे चक्क बाहेर वडापावचा आस्वाद घेताना ऐकू येते असा आजही मला भास होता... चित्रपटगृहाचं चित्रपटाचा इतिहास घडवतात, चित्रपट रसिक निर्माण करतात..

मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीसमोर कॅपिटॉल चित्रपटगृहाची इमारत आहे असेही म्हणता येईल. अतिशय जुन्या म्हणजेच इंग्रजकालीन मुंबईची ओळख असलेली ही वास्तू लक्षवेधक आहे. आपल्या देशात चित्रपट माध्यम व व्यवसाय रूजत असताना मुंबईत एकेक करत नवीन चित्रपटगृह जन्माला आले त्यातील हे एक. अधिक तपशील मिळवता असता समजले की ही मजबूत इमारत १८७९ साली बांधण्यात आली. ही हेरिटेज वास्तू आहे. कुनवरजी पघटीवाला यांनी ती त्या काळानुसार व्हिक्टोरियन कल्चरची ठेवण अशी ही वास्तू उभारली आणि शनिवार व रविवारी येथे एखाद्या मराठी, गुजराती अथवा इंग्लिश नाटकाचा प्रयोग होत असे आणि ते तेवढे पुरेसेही असे. (त्या काळातील अनेक चित्रपटगृहे मुळात नाटकांची होती.)

काही वर्षांनी म्हणजे २८ जानेवारी १९२८ रोजी रंगमंचाचे रूपांतर चित्रपटगृहात केले. अर्थात, आता 'पडदा' आला आणि देश विदेशातील मूकपट येथे प्रदर्शित होऊ लागले. यालाच तब्बल ९७ वर्ष पूर्ण झालीदेखील. १९२९ साली सिधवा कुटुंबाने कॅपिटल थिएटर विकत घेतले. काही वर्षातच 'आपल्या देशात चित्रपट बोलू लागला'... १९३१ साली अर्देशीर इराणी दिग्दर्शित 'आलम आरा' हा पहिला हिंदी बोलपट आणि १९३२ साली चित्रपती व्ही. शांताराम दिग्दर्शित 'अयोध्येचा राजा' हा पहिला मराठी बोलपट रूपेरी पडद्यावर आला. चित्रपट निर्मितीत हळूहळू वाढ होत होती. जनसामान्यांपर्यंत चित्रपट पोहचवायचा तर चित्रपटगृह हवीत ही स्वाभाविक भावना होतीच. आणि शंभर वर्षांपूर्वीची मुंबई ही जेमतेम सायन वांद्रे येथपर्यंतचीच होती आणि त्यात कसलीही दाटीवाटी नव्हतीच. सरळ, शांत आयुष्य होते. इंग्रजकालीन दक्षिण मुंबई हा शहर रचना अभ्यासक्रमाचा आणि इतिहासाचा सखोल वेध घेण्याचा वेगळाच विषय आहे आणि त्यात ही त्या काळातील चित्रपटगृह. ती वास्तू अनेक दृष्टीने महत्त्वाची.

कॅपिटॉल हे अगदीच मोक्याच्या ठिकाणी. जवळच एम्पायर होते. (कालांतराने ते न्यू एम्पायर झाले, तेही बंद झालेय. तीही इमारत आज शांत उभी आहे.) तुलनेत स्टर्लिंग खूपच उशिरा म्हणजे आजच्या काळाचा विचार करता छप्पन वर्षांपूर्वी ते सुरू झाले. न्यू एक्सलसियर हे पूर्वीचे एक्सलसियर. अगदी फार पूर्वी त्याचे नाव नॉव्हेल्टी होते. एकंदरीत 'सिनेमा थिएटर पार्क' म्हणावा असाच स्पॉट. त्यात स्टर्लिंग अनेक वर्ष इंग्लिश चित्रपटांचे हुकमी होते.

कॅपिटॉलला सुरुवातीला सातत्याने इंग्लिश चित्रपट प्रदर्शित होत. मग हिंदी चित्रपट प्रदर्शित होऊ लागले. कधी एखाद्या आठवड्यात एखादा दक्षिण भारतीय प्रादेशिक भाषेतील चित्रपट प्रदर्शित होई. (एकदा 'हर नाईट्स' या चित्रपटाच्या पोस्टरवरुन वादही झाला.) कधी कधी रविवार सकाळी ९ वाजता असाच एखादा साऊथ इंडियन चित्रपट असे आणि मुंबईतील अनेक दक्षिण भारतीय चित्रपट रसिक हमखास गर्दी करीत. यानिमित्त त्यांच्या एकमेकांशी गाठीभेटी होत.











कॅपिटॉलची चित्रपट प्रदर्शित होण्याची प्रथा वेगळीच. खरंतर हा रविवार व सुट्टीचा दिवस वगळता कायमच प्रचंड रहदारीचा, गजबजलेला, गर्दीचा विभाग. याचे कारण अर्थातच पूर्वापार येथे अनेक प्रकारची अक्षरशः असंख्य लहान मोठी सरकारी आणि खाजगी कार्यालये. येथे नागरी वस्तीही आहे. तात्पर्य, कॅपिटॉलला लोकप्रिय चित्रपटाला लॉन्ग रनला म्हणजे रौप्यमहोत्सवी यशाला पूरक वातावरण, पण तरीही येथे असंख्य नवीन चित्रपट एक अथवा दोन आठवड्यांसाठी प्रदर्शित होत. मधूनच त्या दिवसातील एकादा सुपर हिट चित्रपट एक आठवड्यासाठी पुन्हा येई.

मी मीडियात आल्यावर या गोष्टीचा शोध घेतल्यावर समजले, अगदी सुरुवातीपासूनच चित्रपट वितरकांनी कॅपिटलकडे 'शॉर्ट टर्म चित्रपटगृह' म्हणूनच पाहिले. कुलाबा, बोरीबंदर परिसरातील डिफेन्स, स्ट्रॅन्ड, कॅपिटल, रेक्स ही थिएटर्स मेन थिएटरला सपोर्ट सिस्टीम मानली गेली. म्हणजेच नाझ परिसरातील थिएटरमध्ये प्रदर्शित होत असलेला चित्रपट येथेही प्रदर्शित केला जाऊ लागला आणि मग वर्षांनुवर्ष तेच सुरू राहिले. चित्रपट इतिहासातील हीदेखील महत्वाची गोष्ट.

मी गिरगावात राहत असल्याने मला कॅपिटॉल अनेकदा फळले. नाझ, ड्रीमलॅन्ड, नॉव्हेल्टी, मिनर्व्हा इत्यादीत अनेक सुपर हिट चित्रपटांची तिकीटे आगाऊ तिकीट खिडकीवरही मिळणे दिव्य असे. त्यासाठी लांबलचक रांगेत उभे रहावे लागे, पण कॅपिटॉलला मधल्या वारी लवकर गेल्यावर तिकीट मिळण्याची हमी असे. तीच तर महत्त्वाची गंगा थिएटरला 'दोस्ताना'साठी जाण्यापेक्षा कॅपिटॉल बरे पडे. सत्तरच्या दशकात गिरगावातून ६१, ६५, ६६, ६९, १२६ या क्रमांकापैकी कोणतीही बस पकडून दहा पैसे तिकीटात कॅपिटॉलला जाता येई. पिक्चर संपल्यावर चालत यायलाही काहीच वाटत नसे. सुहाग, वो मै नही, घर, धरम करम, सबसे बडा रुपय्या वगैरे अनेक चित्रपट कॅपिटॉलला असेच पाहिले. नाझला एन्जॉय केलेला 'यादों की बारात'मध्येच एक आठवड्यासाठी कॅपिटॉलला लागला तेव्हा पुन्हा एन्जॉय केला. आवडलेला चित्रपट पुन्हा पुन्हा पाहण्याचे ते युग होते.

मीडियात आल्यावर कॅपिटॉलला जाणे कमी होत गेले तरी प्रेस शोला आवडलेले असे 'दिल', 'हत्यार' पुन्हा याच कॅपिटॉलला पाहिले. कॅपिटॉलला समोरच्या बाजूने करंट बुकिंगची खिडकी आणि इमारतीच्या डाव्या बाजूस आगाऊ तिकीट खिडकी, पण तिकीट काढताना अप्पर स्टॉलचे अगदी शेवटच्या दोन रांगेतील तिकीट नकोसे वाटे, कारण बाल्कनीच्या बरोबर खालीच ते असल्याने भले मोठे खांब दुर्लक्षित करुन पडद्यावर लक्ष केंद्रित करावे लागे. तोही अडथळा पब्लिकने सहन केला आणि पडद्यावर लक्ष केंद्रित केले.

दक्षिण मुंबईतील अनेक कार्यालये पूर्वी शनिवारी अर्धा दिवस असत आणि अगदी वसई, विरार, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई असे सगळीकडचे नागरिक वर्षानुवर्ष या परिसरात नोकरी आणि मिटींगसाठी येताहेत. अनेकांना शनिवारी अर्धा दिवस ऑफिस सुटताच कॅपिटॉलला पिक्चर पाहून समोरच लोकल ट्रेन पकडून घरी जायला सवयीचे झाले होते. एकाच फेरीत दोन कामे होत. या विभागात एखाद्या ऑफिस मिटींगसाठी आल्यावर येथेच एकादा चित्रपट पाहणारे फिल्म दीवाने खूप होते. दक्षिण मुंबईत अनेक कॉलेज असल्याने तोही क्राऊड कॅपिटॉलला लाभे. महाविद्यालयीन युवक युवतींच्या गर्दीने अनेक चित्रपटगृहांचे तरुणपण कायम राहिले.

पिक्चरच्या मध्यंतरला कॅपिटॉल थिएटरला लागूनच आराम वडापाव होताच. आजही आहेच. हुकमी गरमागरम. आजही तो आहेच म्हणा आणि पिक्चर संपल्यावर उजव्या बाजूच्या इराणी हॉटेलमध्ये कटींग चहा आणि ब्रून मस्कासह त्याच पिक्चरवर भरपेट चर्चा. ते दिवसच वेगळे होते. हा इराणी काही वर्षांपूर्वी बंद झाला. कॅपिटॉलही बंद झाले. शांत झाले. या परिसरात गेल्यावर हमखास ते नजरेत पडते आणि जुने पिक्चर आठवतात. अधूनमधून याच कॅपिटॉलमध्ये 'पिक्चरचे शूटिंग' झालेय. फराह खान दिग्दर्शित 'ओम शांती ओम'मधील थिएटर हेच आहे. शाहरूख खान, दीपिका पदुकोण यांच्यावरील काही दृश्ये येथेच चित्रीत झालीत. वेंकी अटनुरी दिग्दर्शित लकी भास्कर या चित्रपटातीलही काही दृश्य याच कॅपिटॉलमध्ये चित्रीत झालीत.

यामुळे सिनेमाच्या पडद्यावर कॅपिटॉल राहिलयं, पण प्रत्यक्ष कॅपिटॉलमधील शो केव्हाच संपलाय. जुन्या पिढीतील चित्रपट रसिकांची चित्रपटगृहाशीही बांधिलकी होती. भावनिक ओढ होती. म्हणूनच एकेक करत जुनी सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृहे बंद होत गेल्याने अनेक फिल्म दीवाने हळहळतात. चित्रपटगृह म्हणजे केवळ चार भिंती नसतात तर ते अनेक प्रकारच्या छोट्या छोट्या गोष्टींचे विश्व असते. अनुभव असतो. पडद्यावर चित्रपट सुरू असतो, प्रेक्षक आपापल्या आवडीनुसार तो त्याच पडद्याशी एकरूप झालेला असतो... टाळ्या, शिट्या, हशा याने तो दाद देतो.

जुन्या एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्सना आपले एक व्यक्तिमत्व असे. त्या चित्रपटगृहाचे नाव घेताच वा आठवताच डेकोरेशनसह त्या चित्रपटगृहाची इमारत डोळ्यासमोर येणारच, कारण तेथे फक्त चित्रपट पाहिले असे नव्हे तर त्या चित्रपटगृहाशी एकरूप होऊन ते पाहिले. त्यातील जे आवडले ते डोक्यात ठेवलेत आणि जे आवडले नाहीत ते पडद्यावर ठेवले. मुंबईतील जुन्या काळातील चित्रपटगृहांचा इतिहास माहितीपटाच्या रूपात जतन करण्याची आवश्यकता आहे. चित्रपट इतिहासातील हे एक महत्त्वाचे देणे आहे.

आजही कॅपिटॉलवरून जाताना पटकन जुन्या काळात मी जातोच. माझ्या पिढीतील अनेक चित्रपट रसिकांचेही अगदी हेच होत असेल. आमच्या पिढीला वाचन, चित्रपट, नाटक व भरभरून गप्पा करणे या गोष्टी जगण्याचा एक भाग होता... आज कॅपिटॉल चित्रपटगृहात चित्रपट दाखवत असते, तर त्याला ९७ वर्ष पूर्ण झाली असती यानिमित्त हा फोकस.

# विख्यात वैद्य महर्षी अण्णासाहेब पटवर्धन

महर्षी अण्णासाहेबांचे घराणे मूळचे सरदारी बाण्याचे होते. कोकणात पेशव्यांच्या आरमाराचे अधिपती धुळप म्हणून होते. त्यांच्या पदरी अण्णासाहेबांचे पूर्वज फडणीसपदी काम करीत असत. त्यानंतर त्यांचे पिताश्री यांनी वकिलीची परीक्षा देऊन मुंबईत वकिली केली. तथापि, तेथील हवा न सोसल्याने त्यांनी पुण्यात शनिवारवाड्याजवळ घर बांधून तेथे हे कुटुंब राहावयास आले. त्यांचे वडील भाऊसाहेब हे एक रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे, विलासी स्वभावाचे होते. त्यांची पत्नी साध्वी जानकीबाई होत्या. यापण करारी आणि स्वाभिमानी होत्या, तसेच त्या तपस्वी व अत्यंत श्रद्धाळू होत्या. पटवर्धनांचे कुलदैवत गजानन होते.

त्या रोज ओंकारेश्वर, गुंडाचा गणपती व भिकारदास मारुतीच्या दर्शनाला जात असत. त्यांना मुली झाल्या, पण पुत्र संतान झाले नव्हते. म्हणून जानकीबाईंनी गुंडाच्या गणपतीला प्रदक्षिणा घातल्या. कठोर तपाचरण केले. त्याचे फळ म्हणजे वैशाख वद्य चतुर्थीला, शके १७६९ रोजी त्यांना पुत्ररत्न लाभले. त्याचे नाव 'विनायक' असे ठेवले, ते हे महर्षी अण्णासाहेब होत. त्यांच्या पाठीवर दोन-तीन वर्षांनी त्यांना एक भाऊ झाला. त्याचे नाव नारायण होते. आईचा देवदर्शनाचा



नेम ते अत्यंत श्रद्धेने करीत असत. अण्णासाहेबांचा विवाह दामल्यांच्या रमाबाई यांच्याबरोबर झाला. त्यांना एक मुलगा व एक मुलगी झाली.

अण्णासाहेब हे तैलबुद्धीचे होते आणि त्यांची अफाट स्मरणशक्ती होती. त्यांचे राहणीमान श्रीमंती थाटाचे व ऐटबाज होते. पुण्यात डेक्कन कॉलेजमध्ये बीए पदवी संपादन केल्यावर पुढे सन १८६८ ते १८८०पर्यंत ते मुंबईस होते. तेव्हा त्यांनी एलएलबी व एलएम ॲण्ड एस या लॉ व वैद्यकीय शिक्षणाच्या पदव्या संपादन केल्या. त्याबरोबर आयुर्वेदाचाही अभ्यास केला.

पुण्यात आल्यावर त्यांनी वैद्य महादेवशास्त्री लागवणकर यांच्याकडे आयुर्वेदाचे शिक्षण घेतले. वडिलांच्या सांगण्याप्रमाणे विनायकरावांनी प्रथम वकिलीचा व्यवसाय पुणे येथे राहून उत्तम प्रकारे केला. पुण्यात अण्णासाहेबांनी माधवराव नामजोशी यांच्या मदतीने 'किरण' नावाचे मराठी आणि 'डेक्कन स्टार' नावाचे इंग्रजी पत्रक सुरू केले. पुढे नामजोशींना ते काम जमेना म्हणून ते बंद झाले. पुढे 'केसरी' व 'मराठा' ही पत्रके सुरू झाली. ते मोठ्या अभिमानाने म्हणत असत की, 'या दोन्ही वर्तमानपत्रांचे डिक्लरेशन माझ्या हातचे आहे.' ते मद्रासला एका प्रकरणाच्या कामानिमित्ताने सुमारे तीन-चार वर्षे होते. मद्रासच्या वास्तव्यात त्यांची भेट रामचंद्र अय्यास्वामींशी पडली. त्यांच्यामुळे कांचीपीठाशी त्यांचा संपर्क झाला होता. त्या वेळी त्यांना अनेक प्रकारच्या मंत्रशास्त्राची माहिती झाली होती. त्याच वास्तव्यात त्यांना घटसर्पाच्या आजारातून अंतकाळचा देखावा दिसला. त्यातून ते बरे झाले, पण त्यांच्यात फार मोठे परिवर्तन झाले. ते केवळ पंचा-उपरण्यावर राहू लागले. डोक्यास मुंडासे बांधत असत. मुलांच्या मुंजीनिमित्ताने ते पुण्यास आले, परंतु तेथून परत कोठेही गेले नाहीत. (फक्त आळंदीस गुरुस्थान म्हणून जात असत.)

अण्णासाहेब यांच्याकडे गरीब, श्रीमंत, सर्व जाती-धर्मांचे लोक येत असत. ते सर्वांना समान वागणूक देत असत. त्यांनी अनेकांना फार मोठ्या असाध्य रोगांतूनही बाहेर काढले होते. एकूणच दैवी योजनेचे काम सुरू होते. त्यांना नाडीपरीक्षेचे दर्शन, स्पर्शन व प्रश्न यांचे जबरदस्त ज्ञान होते. अशा प्रकारे वैद्यकीय सेवा-कार्य सुरू होते.


ते लोकमान्य टिळकांसह अनेकांचे गुरू होते. ते एक श्रद्धास्थान होते. याशिवाय महात्मा गांधी, अरविंद घोष, दादासाहेब खापर्डे, काळकर्ते परांजपे, डॉ. नानासाहेब देशमुख, या सर्वांच्या त्यांच्याशी गाठीभेटी झाल्या होत्या. काहींचे सातत्याने येणे-जाणे होते. असे हे धैर्यशील, साहसी, नि:स्वार्थी, त्यागी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे नि:संगता, परोपकार बुद्धीचे थोर दैवी गुणसंपत्तीचे अण्णासाहेब होते.

एकूणच मद्रासहून १८८४ साली पुण्याला परत आल्यावर १९१७पर्यंत म्हणजे ३३ वर्षे ते अशा उन्मनी स्थितीत होते. १९०२ साली त्यांच्या पत्नी निवर्तल्या. त्यानंतर शके १८३९ माघ शुद्ध एकादशीस, १९१७ साली त्यांनी देह सोडला. पुण्यात ओंकारेश्वराजवळच्या नदीपात्रात त्यांच्यावर अग्निसंस्कार झाला. पुणे येथे लोकांनी त्यांची समाधी बांधली आहे. तेथे आजही त्यांचा उत्सव संपन्न होत असतो.

**-डॉ. अजित कुलकर्णी**

# ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर केतकर

मराठीतील पहिले ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा आज (२ फेब्रुवारी) जन्मदिन. मराठी संस्कृतीने ज्ञानाची जी रत्ने जगाला दिली, त्यातलेच हे एक अमूल्य रत्न! १८८४मध्ये तेव्हाच्या मध्य भारतात त्यांचा जन्म झाला, पण शालेय शिक्षण अमरावतीत व उच्च शिक्षण मुंबईच्या विल्सन कॉलेजात झाले. पुढे अमेरिकेतील कॉर्निल विद्यापीठाची डॉक्टरेट त्यांनी मिळवली.



अमेरिकेतून परत येत असताना मे १९११ ते सप्टेंबर १९१२ या काळात डॉ. श्रीधर केतकरे इंग्लंडला होते. इंग्लंडमधेच त्यांचा इंडिथा कोहन या जर्मन तरुणीशी परिचय झाला. पुढे १९२०मध्ये प्रचंड सामाजिक विरोधांचा तोंड देत डॉ. केतकरांनी त्यांच्याशी विवाह केला व त्यांचे नाव शीलावती केतकर असे बदलले.

भारतात परतून डॉ. केतकर कलकत्ता विद्यापीठात अध्यापन करू लागले, पण एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकाच्या धर्तीवर मराठीत ज्ञानकोश असावा ही इच्छा त्यांना अस्वस्थ करीत राहिली. त्यामुळेच ते पुण्यात आले व ज्ञानकोश निर्मितीच्या कामाला लागले.

डॉ. केतकर त्यांच्या ज्ञानकोशांचे प्रमुख संपादक होते. ज्या काळात केतकरांनी ज्ञानकोशाच्या २३ खंडांचे काम केले तो काळ १९१६ ते १९२८ हा आहे. या काळात खुद्द लोकमान्य टिळकांनीसुद्धा त्यांना 'हे काम फार मोठे आहे, एका माणसाचे हे काम नाही' अशा प्रकारचा सल्ला दिला होता, पण केतकरांचा निर्धार पक्का होता. त्या निर्धाराला चिकटून सर्व संकटांवर मात करीत त्यांनी १२ वर्षांमध्ये हा ऐतिहासिक महत्त्वाचा मराठी प्रकल्प पूर्ण केला.

डॉ. केतकरांनी ज्ञानकोशाचे काम सुरू केले तेव्हा त्यांच्यापुढे पथदर्शक म्हणून 'एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका'सारखा एखादा इंग्रजी ज्ञानकोशच तेवढा होता. गुजराथी, तेलुगू यांसारख्या काही भारतीय भाषांमध्ये ज्ञानकोश निर्मितीचे काम होत आहे अशी चिन्हे वा चर्चा तेव्हा होती, पण मराठी ज्ञानकोशाला पथदर्शक ठरू शकतील अशी त्यांची स्थिती नव्हती. एवढ्या मोठ्या प्रकल्पासाठी आवश्यक असणारी पुरेशी आर्थिक ताकद वा साधनसामग्री आपल्याकडे नाही याची जाणीव त्यांना होती. तरीही एकांड्या शिलेदाराप्रमाणे त्यांनी पदरचे सारे पैसे टाकून कामाला सुरुवात केली व या कार्याला आकारही दिला.

गोंडवनातील प्रियंवदा (१९२६), ब्राह्मणकन्या (१९३०) इ. सात कादंबऱ्या १९२६ ते ३७ या काळात लिहून केतकरांनी मराठी ललित साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण भर घातली. त्यांच्या कादंबऱ्या इतर कादंबऱ्यांहून अगदी वेगळा अनुभव वाचकांना देतात.

व्रात्यास्तोमविधीने हिंदू झालेल्या एका जर्मन ज्यू विदुधीशी १९२० साली केतकरांचा विवाह झाला. अपत्यहीनतेमुळे दोन अनाथ मुलांना त्यांनी मायेने घरी सांभाळले. त्यांचे कौटुंबिक जीवन आर्थिक ओढाताणीचे पण समाधानी होते.

ज्ञानकोश संपत आल्यावर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी केतकरांचा गौरव झाला. १९२६ साली शारदोपासक संमेलनाचे व १९३१ साली महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

डॉ. केतकर वयाच्या केवळ ५३व्या वर्षी पुण्याच्या ससून इस्पितळात १० एप्रिल १९३७ रोजी एखाद्या सामान्य रुग्णाप्रमाणे इहलोक सोडून गेले. मधुमेहात एक जखम चिघळल्याचे निमित्त होऊन ते मृत्युमुखी पडले. त्यांच्या अंत्यविधीसाठी त्यांच्या पत्नीला १०० रुपये उसने मागण्याची वेळ आली, अशी नोंद त्यांच्या चरित्रात आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाच्या काळात मराठी ज्ञानकोश निर्मितीसाठी त्यांनी केलेला त्याग अनन्यसाधारण आहे. **(साभार : इंटरनेट)**

# रायगड जिल्ह्यात गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष

## गणेश जन्मोत्सवानिमित्त महड येथे जिल्हाधिकाऱ्यांनी घेतले सपत्नीक दर्शन



**चौक : प्रतिनिधी**

श्री गणेश जयंतीनिमित्त अष्टविनायक क्षेत्र महड येथे भाविकांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी होती. रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या हस्ते सपत्नीक पूजा करण्यात आली.

यानिमित्ताने ३० जानेवारी ते ४ फेब्रुवारीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात महापूजा, अभिषेक, कीर्तन, कत्थक नृत्य, हास्य विनोद कार्यक्रम, खेळ पैठणीचा यांच्यासह अनेक कार्यक्रम होणार आहेत, असे कार्याध्यक्ष मोहिनी वैद्य यांनी सांगितले.

राज्यातील विवीध भागातील भाविक दर्शनासाठी महड येथे दाखल झाले होते. या वेळी चोख पोलीस बंदोबस्त तैनात असून महड संस्थान यांच्या वतीने भाविकांसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

## नांदगावच्या श्री सिद्धिविनायक माघी उत्सवाला भाविकांची गर्दी

**मुरुड :** नांदगावच्या माघी उत्सवाला प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीहीभाविकांनी मोठी गर्दी केली होती.पहाटे दोन वाजता मंदिराचे पुजारी विनायक जोशी, महेश जोशी, शैलेश जोशी यांनी श्रींची शोडषोपचारे पूजा केली त्यानंतर चिटणीस गुप्ते कौटुंबिक ट्रस्ट तर्फे पूजा करण्यात आली तर सेवा मंडळातर्फे गणेश गाणार यांनी सपत्नीक केलेल्या पूजेनंतर मंदिर भक्तांसाठी खुले करण्यात आले.

पहाटे थंडीच्या कडाक्यामुळे दर्शनासाठी भाविकांची गर्दी कमी असली तरी त्यानंतर मात्र त्यात वाढ झाली.यावेळी गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मुरुड पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस, गृहरक्षक दल, नजिकच्याच यशवंतनगर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी मोठे सहकार्य केले.



## अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भक्तीसागर लोटला; विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात

**सुधागड : प्रतिनिधी**

अष्टविनायक देवस्थानांपैकी एक पालीतील श्री बल्लाळेश्वराचा माघी मासोत्सव व श्री बल्लाळेश्वराचा जन्मोत्सव शनिवारी (ता.१) फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी धार्मिक कार्यक्रम व विधी करण्यात आले. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भक्तांच्या लांब रांगा लागल्या होत्या.



जन्मोत्सवाला बाळ गणेशाच्या मूर्तीला पाळण्यात टाकून भक्तिभावाने पाळणा हलविण्यात आले. यावेळी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे सरपंच (अध्यक्ष) जितेंद्र गद्रे, उपसरपंच (उपाध्यक्ष) वैभव आपटे, विश्वस्त प्रमोद पावगी, विश्वास गद्रे, अरुण गद्रे, अमोल साठे, डॉ. पिनाकिन कुंटे, माजी अध्यक्ष ॲड. धनंजय धारप, धनंजय आदी मान्यवर व भक्त उपस्थित होते. जन्म सोहळ्याच्या कीर्तनास व इतर कार्यक्रमात भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माघी महोत्सवानिमित्त प्रशासन, नगरपंचायत व देवस्थान यांच्या समन्वयातून योग्य नियोजन करण्यात आले होते. सनईवादन, अभिषेक आणि श्रींचे जन्मोत्सव कीर्तन झाले. सायंकाळी श्रींचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तीभावत निघाला, तसेच श्री बल्लाळेश्वराला महानैवेद्य ठेवण्यात आले.

## कर्जतमधील शेतकऱ्यांना किसान ओळखपत्राचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सशक्त व समृद्धीसाठी केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमानाने अग्रिस्टॅक ही एक क्रांतिकारी संकल्पना अमलात आली आहे. याची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात सुरू झाली आहे. कर्जत तालुक्यातील कडाव येथील मंडल कार्यालयात शेतकऱ्यांना किसान ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले.



ग्रीस्टॅक म्हणजे शेतकरी माहिती संच, हंगामी पीक माहिती संच,भू संदर्भीय भूभाग माहिती संच याची निर्मिती म्हणजे ॲग्रीस्टॅक. या संकल्पनेतून शेतकरी ,ग्राहक ,विक्रेते व सरकार यांना एकत्र ठेवते तसेच शेती प्रक्रियेतील अचूक माहिती मिळते व पारदर्शकता कायम राहते ॲग्रीस्टॅक मुळे शेतकऱ्यांना अनेक फायदे मिळणार आहेत किसान ओळखपत्र हे शेतकऱ्यांना अनिवार्य असून तो देण्यासाठी कर्जत तालुक्यात कडाव मंडळात कडाव तलाठी कार्यालय येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या मेळाव्यात उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी शेतकऱ्यांना किसान ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मंडल अधिकारी कडाव संतोष जांभळे, तलाठी दत्ता ठोकळ, विलास मिरगणे, प्रविण गवई, मीना कालिंदर आदी उपस्थित होते. शासनाच्या या शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असणारी ही योजना चा लाभ सर्व शेतकरी वर्गाने घ्यावा यासाठी तलाठी मंडल अधिकारी यांच्या मार्फत महा-ई-सेवा केंद्रात आपला फार्मर आयडी तयार करावे ग्रीस्टॅक च्या अंतर्गत दिले जाणारे फार्मर आयडी मुळे शेतकऱ्यांना डिजिटल फायदे व माहिती सेवा बाबतचे फायदे होणार आहेत डिजिटल सेवेअंतर्गत शेतकऱ्याला पीएम किसान ची रक्कम डीबीटी द्वारे प्रत्यक्ष खात्यावर जमा होणार आहे तसेच एम. एस .पी .चा लाभ होणार आहे पिक विमा कर्ज व पीक कर्ज हे डिजिटल स्वरूपात मिळणार आहे तसेच माहिती सेवा अंतर्गत हवामानाची माहिती, मृदा आरोग्याची माहिती मिळणार आहे बाजारभावाची माहिती मिळणार आहे पिकाबाबत सल्ला मार्गदर्शन मिळणार आहे. या असे अनेक फायदे शेतकऱ्यांना या फार्मर आयडी मार्फत मिळणार आहेत. याबाबत शासन स्तरावर मोठ्या प्रमाणात महसूल विभागातील तलाठी मंडळ अधिकारी हे गावोगाव शिबीरे आयोजित करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्ती फार्मर आयडी प्राप्त करून देणार आहेत.

या शेतकरी शिबिरास कर्जत अप्पर तहसीलदार दुर्गा देवरे मॅडम यांनी देखील भेट दिली कर्जत तालुक्यात सात मंडळात शेतकरी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पोलीस पाटील रमेश पवळी, निमसे व कोतवाल तळपे आदिसह शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

## डॉ. दिवाकर कदम यांच्या संशोधनाचा पेपर अमेरिकेत प्रकाशित

**माणगाव : बातमीदार**

डॉ. दिवाकर धोंडू कदम, सहयोगी प्राध्यापक, द. ग. तटकरे महाविद्यालय तळा यांच्या संशोधन पेपरचा समावेश IGI Global Scientific Publishing, United States of America यांनी प्रकाशित केलेल्या आंतरराष्ट्रीय पुस्तक Solid Waste Management for Rural Regionsमध्ये करण्यात आला आहे.



या पुस्तकात त्यांनी ग्रामीण महाराष्ट्रातील घनकचरा व्यवस्थापनासाठी (SWM²) सामुदायिक सहभाग आवश्यक असून तो शाश्वत विकास व सार्वजनिक आरोग्यासाठी महत्त्वाचा आहे यावर संशोधन सादर केले. ग्रामीण भागांमध्ये अनेक आव्हाने जसे की कचरा गोळा करण्याच्या अपुऱ्या सुविधा, अयोग्य विल्हेवाटीच्या पद्धती आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाच्या पद्धतींबाबत जागरूकतेचा अभाव दिसून येतो. या अभ्यासामध्ये स्थानिक समुदायांना घनकचरा व्यवस्थापनात सहभागी होण्यासाठी कसे प्रेरित करता येईल यावर प्रकाश टाकला आहे.

## मुरूड पालिकेच्या शववाहिनींचे लोकार्पण

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड जंजिरा नगर परिषदेच्या शववाहिनीचे लोकापर्ण प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी-सचिन बच्छाव यांच्यासह कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आबंतेकर, आरोग्य निरीक्षक राकेश पाटील, लेखापाल कपिल वेहले, प्रशांत दिवेकर, सतेज निमकर, सहायक कर निरीक्षक अनिकेत जगदाळे, जयेश चोडणेकर, अभिजीत चांदोरकर, सुदेश माळी, ओंकार पोतदार, निलेश शेंडगे, प्रसाद जाळगांवकर, अभिजीत कारभारी, नयन शिंदे, विनायक तळेकर, उल्हास घराणे आदींसह नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते.

कोरोना पासुन शहरातील नागरिकांनी स्मशानभूमीत पार्थिव खांद्यावर घेऊन प्रता बंद करून पार्थिव टेम्पो मधुन स्मशानभूमीत नेण्याची परंपरा सुरू केली, परंतु यांचा गरीब कुटुंबाना खर्च परवडत नसल्याने त्यांना आर्थिक फटका बसत आहे. याबाबत मुरुड जंजिरा नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी दखल घेऊन नगरपरिषदेच्या वतीने शहरातील अंत्यसंस्कार करण्यासाठी पार्थिव घरून स्मशानभूमीत घेऊन जाण्यासाठी शहरातील नागरिकांच्या मागणीनुसार मुरुड जंजिरा नगरपरिषद फंडातुन शववाहिनी वाहन उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शववाहिकेत शवपेटी ठेवण्यात येणार आहे तसेच मृतदेहाव्यतिरिक्त कुटुंबातील सदस्यांना शववाहिकेत बसण्याची व्यवस्था देखील असणार आहे.

शववाहिकेच्या सुविधेसाठी नगरपरिषदेच्या ०२१४४२७४०२२ या हेल्पलाइन क्रमांकावर फोन करुन शववाहिनी वाहन मागुन घ्यावे, असे आवाहन नगरपरिषद कार्यालयाकडुन सांगण्यात आले.

## पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील रस्ता दुचाकीस्वारांसाठी धोकादायक!

**खोपोली : प्रतिनिधी**

गॅस वाहिनीच्या कामाकरता खोदलेला पाताळगंगा औद्योगिक वसाहती मधील रस्ता दुरुस्ती न केल्याने धोकादायक बनला असून दुचाकीस्वारांचे किरकोळ अपघात सातत्याने घडत आहेत. खालापूर तालुक्यातील पाताळगंगा औद्योगिक वसाहत सावरोली खारपाडा मार्गावर आहे. तीन वर्षांपूर्वी औद्योगिक वसाहती मधील सुमारे दोन किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण तसेच दुतर्फा पक्की सिमेंटची गटार बांधकाम करण्यात आले होते .शिवाय दोन्ही बाजूला फुटपाथ देखील बांधण्यात आले होते. परंतु वर्षभरापूर्वी जमिनीखालून गॅस वाहिनी टाकण्याच्या कामासाठी पाताळगंगा वसाहती मधील रस्ता अनेक ठिकाणी खोदण्यात आला. काम झाल्यानंतर रस्ता पूर्ववत करणे आवश्यक होते. परंतु तात्पुरती मलमपट्टी करण्यात आली होती. या ठिकाणी पुन्हा खड्डे पडले आहेत. पाताळगंगा वसाहतीत अवजड वाहतूकदेखील सुरू असल्याने एखादा जीव घेणा अपघात घडण्यापूर्वी रस्त्याचे योग्य प्रकारे दुरुस्ती करावी अशी मागणी प्रवासी करत आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिकारी यांचे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. वसाहती मधील रस्त्यावर अनधिकृत पार्किंग यामुळे रस्ता अधिक धोकादायक बनला आहे.

**खड्ड्याचा अंदाज न आल्याने अपघाताची भीती सतावत आहे. वेळेवर रस्त्याची दुरुस्ती व्हावी अशी अपेक्षा आहे.**

**- निकेतन मोधळे, पाताळगंगा वसाहत**



## मोरे महाविद्यालयात मानसिक आरोग्य व्यवस्थापनाबाबत व्याख्यान

**रोहा : प्रतिनिधी**

एम बी मोरे फाउंडेशन कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत ३० जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत दत्तक ग्राम रोठ बुद्रुक येथे माघी गणेशोत्सवा चे औचित्य साधून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तसेच ग्रामस्थांसाठी 'ताणतणाव' या विषयावर अंशुल स्पेशलिटी मॉलिक्युल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत ग्रुप ग्रामपंचायत रोठ बुद्रुक येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या व्याख्यानाचे प्रमुख प्रशिक्षक गजानन मळेकर यांनी ताण तणाव यावर विद्यार्थिनींना उत्तम मार्गदर्शन केले यामध्ये ताण तणाव निर्माण होण्याची कारणे , त्यामध्ये वैयक्तिक सामाजिक कौटुंबिक आर्थिक इत्यादी द्वारे निर्माण होतात विशेषता यामध्ये मनामध्ये भीती, थकणे, मानसिक तणाव इत्यादी असतात यावर केले जाणारे उपाय योग्य व्यायाम, विवेक बुद्धी, नियम बनविणे, नेहमी आनंदी राहणे, असे विविध उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास अंशुल स्पेशलिटी मॉलिक्युल्स प्रायव्हेट लिमिटेड चे साईट हेड विभाग प्रमुख शितळकर, व्यवस्थापकी किशोर तावडे ग्रुप ग्रामपंचायत रोड बुद्रुक सरपंच नितीन दत्ताराम वारंगे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, माजी उपसरपंच रमेश मोरे, सदस्य मंगेश देवकर , ग्रुप ग्रामपंचायत ग्रामसेविका अलका बामगुडे, ग्रामस्थ रुपेश साळुंखे संदीप वारंगे, तसेच महाविद्यालयीन शिक्षक प्रा. ममता बिंद, प्रा. ऋतुजा कांबळे, महिलावर्ग उपस्थित होते त्याचबरोबर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. मयूर पाखर यांनी केले. या कार्यक्रमासाठी ५३ विद्यार्थिनी सहभागी झाल्या.

## महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी तारतम्य बुद्धीचा वापर व्हायला हवा -डॉ. सुरेशकुमार मेकला

**खालापूर ,चौक : प्रतिनिधी**

पुस्तकी शिक्षणापेक्षा महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी तारतम्य बुध्दीचा वापर व्हायला हवा किंबहूना रस्ते सुरक्षा अभियान हे जानेवारी महिन्या पुरते मर्यादित न रहाता वर्षाचे बारा महिने राबवणे गरजेचे आहे असे प्रतिपादन डॉ. सुरेश कुमार मेकला,अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य यांनी केले.



मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पळस्पे केंद्रात, पोलीस अधीक्षक महामार्ग सुरक्षा पथक रायगड परिक्षेत्र, यांच्या वतीने रस्ते सुरक्षा अभियान २०२५ च्या अनुषंगाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी बोलतांना,महामार्गावर होणारे अपघात टाळण्यासाठी समाजातील सर्वच घटकांनी संयुक्त प्रयत्न करायला हवेत. आपल्या मागे परिवार आहे ही भावना सतत मनात असायला हवी. वाहन चालवताना शॉर्टकटचा वापर आणि नियम भंग झाल्यास स्वतः सोबत इतरांचा जीव धोक्यात येऊ शकतो. युवा पिढीनेही महामार्गावरील सुरक्षा या विषयाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे, असे सांगितले

या वेळी महामार्गावरील अपघात टाळण्यासठी आणि तत्परतेने पोलीस यंत्रणेला अपघात प्रसंगी स्वयंस्पूर्तीने मदत करणाऱ्या अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामजिक संस्था, मृत्युंजय देवदूत, आय आर बी पेट्रोलिंग टीम, डेल्टा फोर्सचे जवान, देवदूत यंत्रणा, लोकमान्य हॉस्पीटलचे कर्मचारी, पोलीस कर्मचारी तसेच पत्रकार आणि सामजिक कार्यकर्ते यांचा सत्कार डॉ. सुरेशकुमार मेकला यांच्या हस्ते करण्यात आला.

अपघातात कशा प्रकारे मदत करता येऊ शकते याबाबत हेल्प फाऊंडेशनचे अध्यक्ष गुरुनाथ साठेलकर यांनी माहिती दिली तर सारथी सुरक्षा सेवा संस्थेचे अध्यक्ष विनय मोरे यांनी उपस्थितांना प्रवास करतांना सिग्नलची उपयुक्तता तसेच सुरक्षित प्रवासासाठी महत्वाच्या टिप्स दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्तविक तानाजी चिखले पोलीस अधिक्षक महामार्ग सुरक्षा पथक रायगड यांनी, तर आभार प्रदर्शन ज्योत्स्ना रासम उपविभागीय पोलिस अधिकारी रायगड यांनी केले. रस्ते सुरक्षा अभियाना अंतर्गत निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धेत गुणांकन प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

महामार्ग वाहतूक पोलीस विभागासाठी आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धातील विजेत्या बोरघाट आणि पळस्पे केंद्राच्या टीमचाही पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात विक्रम कदम उपविभागीय पोलिस अधिकारी खालापूर, पोलीस निरीक्षक विनोद माळवे, प्रभारी अधिकारी वैभव रोंगे, आरटीओ विभागाचे जय शेठे इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

# चिरनेरमध्ये महागणपतीच्या दर्शनासाठी गर्दी

## गणेश जयंतीनिमित्त लाखो भाविकांनी घेतले श्रींचे दर्शन





**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर शब्द उच्चारला की, श्री महागणपती व चिरनेर जंगल सत्याग्रह ही दोन नावे पुढे येतात. याच उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात माघी गणेश जयंतीच्या निमित्ताने शनिवारी लाखो भाविकांनी प्राचीन जागृत श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला.

रात्री तीन वाजताच मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. यावेळी प्रथम श्री महागणपतीचा अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर श्रींच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाचा जयघोष करीत भक्तीमय वातावरणात श्रींचे दर्शन घेतले.

यावेळी हजारो गणेश भक्तांनी श्रींच्या जन्मोत्सवाचा, कीर्तनाच्या श्रवण सुखातून लाभ घेतला. त्यानंतर दुपारी महाप्रसादाला सुरुवात झाली आणि या महाप्रसादाचा समस्त चिरनेरच्या आजूबाजूचे गाववासीच नव्हे तर राज्यातील अनेक भागातून आलेल्या भाविकांनी देखील लाभ घेतला. श्री महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन असून, येथील श्रींच्या दर्शनासाठी मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे, डोंबिवली, कल्याण, उरण, पनवेल, पेण तसेच राज्याच्या अनेक भागातून, आलेल्या लाखो भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली होती. चिरनेर गावातील माघी गणेशोत्सव हा प्रचंड मोठ्या प्रमाणावर होत असल्याने, संपूर्ण चिरनेर गाव भाविक भक्तांनी फुलून निघाले होते.

भक्तगणांची गैरसोय होऊ नये, सर्वांना सुखकर सोयी सुविधा मिळून, रांगेत दर्शन घेता यावे, वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी चिरनेर गणपती देवस्थान प्रशासनाकडून कडक बंदोबस्त आणि आवश्यक सुसज्ञ नियोजन करण्यात आले होते. उत्सवानिमित्त चिरनेरच्या नागरिकांनी भक्तांच्या स्वागतासाठी जागोजागी स्वागत फलक उभे केले आहेत. तसेच विविध महत्त्वाच्या ठिकाणी स्वागत कमानी देखील उभारल्या होत्या. श्रींच्या दर्शनासाठी आलेल्या गणेश भक्तांच्या अफाट गर्दीमुळे चिरनेरच्या तिर्थक्षेत्रात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.



# नेरूळ येथील ओल्ड एज होमचे लोकार्पण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या संकल्पनेतून नेरूळ सेक्टर ३८ येथे उभारण्यात आलेल्या ओल्ड एज होमचे लोकार्पण आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, अलीकडे एकत्र कुटुंब पद्धती लोप पावून विभक्त कुटुंब पद्धत प्रचलित होत असल्याने वृद्ध आई-वडिलांवर एकाकी राहण्याची वेळ आली आहे. मुला-मुलींनाही स्वत:च्या आईवडिलांची जबाबदारी आज नकोशी वाटते. त्यामुळे त्यांना वृद्धाश्रमात पाठविण्याचा विचार वाढायला लागला असून ज्येष्ठ नागरिकांना या ओल्ड एज होम चा एक आधार मिळाला असल्याचे आ. मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब टेकाळे, मुंबई प्रादेशिक ज्येष्ठ नागरिक महासंघ अध्यक्ष सुरेश पोटे, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष सी.व्ही.रेड्डी, उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, नेरूळ तालुका अध्यक्ष राजू तिकोने, कमल शर्मा, प्रभाकर कांबळे, बळवीरसिंग चौधरी, जयवंत तांडेल, पांडुरंग आमले, संजय ओबेरॉय, अजय सिंग, अजय वर्मा, आरती राउळ, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, उपायुक्त किसनराव पलांडे, सहा. आयुक्त डॉ. अमोल पालवे तसेच ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे पदाधिकारी व समाजविकास विभागाचे अधिकारी वर्ग उपस्थित होते.

# हळदीकुंकू समारंभातून सुरक्षाविषयक जनजागृती



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील विविध ठिकाणी मकरसंक्राती पासुन हळदीकुंकूवाच्या कार्यक्रमांचे आयोजन विविध संस्था, लोकप्रतिनिधी वा पक्षांच्या माध्यमातून केले जाते. त्यानुसार माजी नगरसेविका फशीबाई भगत, वैजयंती भगत व रुपाली निशांत भगत यांनी जुईनगर, सानपाडा - पामबीच वा वाशीगाव अश्या तीनही ठिकाणी तीनही प्रभागातील महिला भगिनींसाठी २४ ते २६ जानेवारी या तिन्ही दिवशी हळदीकुंकू कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

हळदीकुंकू कार्यक्रमात केवळ हळदीकुंकू व वाण एवढेच नियोजन न करता याच कार्यक्रमातून उपस्थित महिलांना नवी मुंबई पोलिसांच्या निर्भया पथकातील महिला अधिकारी सविता मोहिते यांनी महिलांच्या बाबतीत होणारे सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक व मोबाईलशी संबंधित कॉल व इतर गैरवापर याबाबतीत घडलेल्या घटनांच्या उदाहरणासह सावधानता कशी बाळगावी याबाबत सविस्तर माहिती दिली, तसेच कार्यक्रमात उपस्थित महिलांशी थेट संवाद देखील महिला पोलीस अधिकाऱ्यांनी साधला.

कार्यक्रमांत निवेदक राजेश तांबडे व दामिनी नलावडे यांच्यावतीने विविध खेळांचे मनोरंजनपर आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तिन्ही प्रभागातील महिला कार्यकर्त्यां व महिला बचत गटांचे विशेष सहकार्य लाभले.

# प्रतीक गोस्वामी मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

प्रतीक गोस्वामी यांनी २९फेब्रुवारी रोजी मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारला.मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी ते मुख्य दक्षता अधिकारी, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि.च्या अतिरिक्त कार्यभारासह मध्य रेल्वेचे वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक आणि मुख्य दक्षता अधिकारी म्हणून काम करत होते. ते १९८८ च्या बॅचमधील भारतीय रेल्वे स्टोअर्स सेवेचे अधिकारी आहेत. त्यांनी इंटिग्रल कोच फॅक्टरी, चेन्नई येथे त्यांच्या कार्यकाळात वंदे भारत एक्सप्रेससाठी घटक (लोपिशपी) खरेदी करण्यात आणि त्यांच्या वेळेवर वितरण सुनिश्चित करताना माननीय पंतप्रधानांच्या घोषणेनुसार वंदे भारत एक्स्प्रेस गाड्या सुरू करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. प्रथम पूर्ण डबल स्टॅक कंटेनर ट्रेनची सुरूवात करण्यात आणि यशस्वीरित्या चालवण्यामध्ये मोलाची भूमिका बजावली होती, जो एक जागतिक विक्रम आहे.



**रसायनी : आपटा येथील तळ्यातील घाण, वाढलेली झाडी यांची साफसफाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.** (छाया : बी.एस. कुलकर्णी)



# रसायनीत रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, थालीया लाभ बिल्डर ग्रुप, वृंदावन फ्लोरा सोसायटी व पोलो हॉस्पिटल नेरूळ नवी मुंबई यांचा संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिराचा उपक्रम झाला.

रक्तदान हे सर्वांत श्रेष्ठ दान आहे आणिबाणीमध्ये कोणालाही रक्ताची गरज लागेल सांगता येत नाही. अशा परिस्थितीत रक्तदानाचे महत्व प्रचंड आहे व तसेच प्लास्टिक बंदी जनजागृती म्हणून कापडी बॅग वाटप करण्यात आले. सदर रक्तदान शिबिरात साठहून अधिक नागरिकांनी रक्तदान केले.

या वेळी उपस्थित अनिल कुमार, विलास जाधव, योगेश कांबळे सुजित बरानवल, विकास कांबळे,वसंत पाटील, विशाल पालवे, अप्लेश किस्मतराव, उमेश मुंढे, राजेश गुजर, अजय गावडे, मनोज महाडिक हर्षवर्धन गायकवाड, विशाल वाकडे, रवींद्र जाधव, सचिन काळे सुनील पाटील, राकेश गुसई, सुजित सिंग,मेश विचारे, अनंत माळी, मिलिंद भगत, सचिन अंबवणे, बाबासाहेब मुरकुटे इत्यादी रहिवाशी पाहुणे व अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच गुलमोहर बिल्डिंग कॉसमॉस, बिल्डिंग, ब्ल्यू बेल बिल्डिंग, जस्मिन बिल्डिंग, अंथोरियम बिल्डिंग येथील रहिवाशानी सदर कार्यक्रम यशस्वी केला.

# मॉर्निंग सायकलिंगदरम्यान नवी मुंबईतील सुविधांची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेमधील नवी मुंबई शहराचे मानांकन उंचावण्यासाठी विविध मोहीमा, उपक्रम राबवित सर्व स्तरावरुन प्रयत्न केले जात असताना महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नुकत्याच आठही विभागांमध्ये महामार्ग, मुख्य रस्ते, वर्दळीची ठिकाणे, दुर्लक्षित जागा याठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या.

या मोहीमांतर्गत रस्ते, पदपथ, दुभाजक यांच्या कडेला जमा झालेली माती गोळा करुन हवेतील धूळीचे प्रमाण कमी करण्याकडे विशेष लक्ष देण्यात आले. या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी प्रत्यक्ष फिल्डवर उतरुन पाहणी करण्यास सुरुवात केली असून आज त्यांनी ऐरोली विभागातील मुख्य रस्ते व प्रामुख्याने एमआयडीसी भागातील रस्ते तसेच स्वच्छता, डेब्रिज, दुभाजक, आयलँड, रस्त्याच्या साईडपट्ट्या अशा विविध बाबींची पाहणी केली. विशेष म्हणजे ही पाहणी त्यांनी सायकलवरुन केली.

चारचाकी गाडीने जाताना वेगामुळे काही वेळा प्रत्यक्ष स्थितीचा अंदाज येत नाही, त्यामुळे सायकलसारखे पर्यावरणपूरक वाहन वापरुन शहरातील स्थितीचा आयुक्त कार्यालयीन वेळीच्या आधी सकाळी लवकरच नियमित आढावा घेत असतात. आज त्यांनी संबधित अधिका-यांना घेऊन कोणत्या भागाची पाहणी करणार याची पूर्वकल्पना न देता ऐनवेळी सांगत ऐरोली भागाची पाहणी केली.

सेक्टर ५ येथील टि जंक्शनपासून सुरुवात करीत अंडरपास खालून डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर परिसर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शाळा व एमआयडीसी रोडने ऐरोलीपर्यंतच्या पाहणी दौ-यात ठिकठिकाणी थांबत आयुक्तांनी मौलिक सूचना केल्या. शाळा परिसर तसेच अंतर्गत भागातील परिसर स्वच्छ व नीटनेटका असावा तसेच तेथील सुविधांबाबत त्यांनी निर्देश दिले.



परिसर स्वच्छतेप्रमाणेच नागरिकांना चालण्यासाठी पदपथ रिकामे असावेत हे लक्षात घेउन पदपथांवरील अतिक्रमण काढावे, बांधकामे सुरु आहेत अशा ठिकाणी उंच पत्रे लावलेले असावेत व तेथील डेब्रीजची वाहतूक महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी बांधकाम व्यवसायिकाकडूनच करुन घेण्यात यावी असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

भिंतींवरील भेगांमध्ये अथवा पदपथांच्या कडेला उगवलेली छोटी रोपे लगेचच काढून टाकावीत तसेच ज्याठिकाणी शिल्पाकृती उभारलेल्या आहेत अशा ठिकाणचे सुशोभिकरण व्यवस्थित करुन घ्यावे असे आयुक्तांनी निर्देशित केले. रस्त्यांवर तसेच काही कॉर्नरला टाकलेले डेब्रीज उचलून घ्यावे व डेब्रीज विरोधी पथके अधिक कृतीशील करावित असेही त्यांनी निर्देशित केले. काटईकडे जाणा-या उड्डाणपूलाखाली एमआयडीसी रोडच्या दोन्ही कॉर्नरला बांबू व इतर देशी वृक्षारोपांची लागवड करावी अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

एमआयडीसी भागातील रस्त्याचा दुभाजकामधील हिरवळीची व छोट्या झाडांची दूरवस्था पाहून नाराजी व्यक्त करीत आयुक्तांनी त्यामध्ये त्वरित सुधारणा करण्याचे निर्देश संबधितांना दिले. अश्विन कॉरीजवळील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करुन घ्यावी व त्याभोवतालचा परिसर स्वच्छ व सुशोभित करुन घ्यावा असेही आयुक्तांनी निर्देश दिले.

शहरातील मुख्य रस्ते हे आपल्या शहराचा आरसा असून खड्डेमुक्त रस्त्यांसाठी आवश्यक तेथे सुधारणा तसेच त्यावरील माती उचलून हवा गुणवत्तेत सुधारणा करणे व स्वच्छता व सुशोभिकरण हे आपले प्राधान्य असले पाहिजे असे निर्देश देत केवळ पाहणी केलेल्या भागाची नाही तर शहरातील सर्वच भागांची दिलेल्या सूचनांनुसार सुधारणा तत्परतेने हाती घ्यावी असे स्पष्ट निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी यावेळी दिले. या दौ-यात त्यांच्या समवेत शहर अभियंता शिरीष आरदवाड, परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ २ चे उपआयुक्त संतोष वारुळे, ऐरोली विभागाचे सहा. आयुक्त अंकुश जाधव, कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे, मनोहर सोनावणे, प्रवीण गाडे व इतर अधिकारी उपस्थित होते.

क्लिक...क्लिक...!

(छाया : सुधीर नाझरे)



**मुरुड : खोरा बंदरातून जंजिरा किल्ल्यात जाण्यासाठी नूतन जेटी बनवण्यात आली आहे. येथे तपासणीसाठी प्रवासी बोटी जेटीला लावण्यात येतात, पण समुद्राचा प्रवाह जुळत नसल्याने बोटी जेटीवर लावताना खूप त्रास होतो असे बोटधारकांचे म्हणणे आहे. यावर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.**

# जितेंद्र म्हात्रेंना राष्ट्रपती पोलीस पदक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यामध्ये कर्तव्यावर असणार्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र विठ्ठल म्हात्रे यांना राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर करण्यात आले आहे. नवी मुंबई पोलीस दलामध्ये प्रचंड दबदबा असणारे अंमलदार म्हणून म्हात्रे यांची ओळख आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त त्यांना पदक जाहीर करण्यात आले.

रायगड पोलीस दलात जितेंद्र म्हात्रे भरती झाले. माणगाव खालापूर पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग रायगड अलिबाग, तसेच पोलीस मुख्यालय व त्यानंतर २००७ पासून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात गुन्हे शाखा , पनवेल तालुका पोलीस खारघर त्यानंतर लागलीच पनवेल तालुका पोलीस ठाण्यामध्ये त्यांची बदली झाली. सध्या तेथेच ते कर्तव्यावर आहेत. दरोडेखोर भिकू वाघमारेचा त्यांनी सामना करून अटक केल्याची पोलीस दप्तरी नोंद आहे.



वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये गुन्हेगारांना पकडण्यासाठी त्यांनी अंमलदार म्हणून संबंधित अधिकार्यांची साथ केली. म्हात्रे यांना पोलीस दलातून रिवार्ड सुद्धा मिळालेले आहेत. त्यांना भारतीय ७६ व्या प्रजासत्ताक दिनी राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर करण्यात आलेले आहे.

# अलिबागमध्ये साकारणार भव्य मत्स्यालय

## ◆ आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते भूमिपूजन ◆ पर्यटन व्यवसायाला चालना मिळण्याचा व्यक्त केला विश्वास






**अलिबाग : प्रतिनिधी**

दुबईच्या धर्तीवर अलिबाग येथे भव्य मत्स्यालयाची उभारणी होणार असून हा देशातील अशा प्रकारचा पहिलाच मत्स्यालय प्रकल्प आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात अलिबाग मध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी हे मत्स्यालय आकर्षणाचे केंद्र ठरेल, असा विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केला.

अलिबाग नगर परिषदेच्या विशेष अनुदान योजनेतंर्गत अलिबाग समुद्र किनारी भव्य मत्स्यालयाची उभारणी केली जाणार आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाचा भूमिपूजन पार पडला. त्या वेळी ते बोलत होते.

या प्रकल्पासाठी राज्य शासनाने ६० कोटी रुपयांचे विशेष अनुदान मंजूर केले आहे. विविध प्रकारचे सागरी मासे या मत्स्यालयात ठेवले जाणार आहेत. ४० फूट लांबीच्या मत्स्यालय टनेलचा यात समावेश असणार आहे. याशिवाय या मत्स्यालयात पर्यटकांना पाण्यात उतरून सागरी जीवसृष्टीचा अनुभव घेता येणार आहे. फूड कोर्ट आणि कॅफेटेरीयाचाही या समावेश असणार आहे.

दुबईच्या धर्तीवर हे मत्स्यालय उभारण्यात येणार असून देशातील अशा पद्धतीचे हे पहिले मत्स्यालय असणार आहे. आठ महिन्यात मत्स्यालयाचे बांधकाम पूर्ण केले जाईल. त्यामुळे आगामी काळात अलिबागमध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी हे मत्स्यालय आकर्षणाचे केंद्र ठरेल. अलिबागच्या समुद्र किनाऱ्यावर असलेल्या मैदानात या मत्स्यालयाची उभारणी केली जाणार आहे. कंटेनर पद्धतीच्या या अभिनव मत्स्यालयात बोगद्याच्या आतून सागरी माशांचे विश्व अनुभवता येणार आहे.

या भूमिपूजन सोहळयाला जिल्हाधिकारी किशन जावळे, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, माजी नगरसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एक्स्प्रेस वेवर चार वाहनांचा विचित्र अपघात; सुदैवाने जीवितहानी नाही





**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघाताची मालिका सतत सुरु असून शनिवारी (दि. १) पहाटे ३च्या सुमारास एका अज्ञात कंटेनर अचानक मध्ये आल्याने पाठीमागून येणाऱ्या तीन वाहने एकमेकांना धडकली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही

एक्स्प्रेस वेवरून मुंबईहून पुण्याकडे अज्ञात कंटेनर जातं असताना तो खालापूर पोलीस स्टेशन हद्दीत वारद गावाजवळ आला असता अज्ञात कंटेनर शोल्डर लेनला थांबला व तो अचानक तिसऱ्या लेनकडे आला. त्यामुळे त्याच्या पाठीमागून भरधाव वेगात येणाऱ्या टँकर (जीजे ०५ बीएक्स ९१२१)वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील कंटेनरला जोरदार धडक दिली, तर एक्स्प्रेस वेवर अचानक टँकर थांबल्याने त्याच्या पाठीमागून येणाऱ्या ट्रकने (एमच ४३ वाय ०२९६) समोरील टँकरला आणि लोखंडी रेलिंगला जोरदार धडक तो एक्सप्रेसवेवर थांबला. टँकर अचानक थांबल्याने त्याच्या पाठीमागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने (एमएच १२ एफझेड ८६११) याने समोरील ट्रकला धडक दिल्याने भीषण अपघात झाला.

अशा प्रकारे एक अज्ञात कंटेनर, टँकर दोन ट्रक यांचा भीषण अपघात झाला असून या अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नाही, मात्र वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, ही तिन्ही अपघातग्रस्त वाहने आयआरबीच्या क्रेनने बाजूला घेऊन एक्स्प्रेस वे वाहतूकसाठी पूर्ववत करण्यात आला.

---

# शाश्वत उपजीविकेला प्राधान्य द्या -फादर थॉमस

**माणगाव : बातमीदार**

सर्व विकास दीप संस्था गेली अनेक वर्ष तालुक्यातील आदिवासी बंधू- भगिनींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देत आहे. यामध्ये शिवणकला, गवंडी काम, इलेक्ट्रीशन, कुक्कुटपालन, मत्स्यशेती, कडधान्य शेती, नाचणी, वरी लागवड, भातशेती, विशेष म्हणजे भाजीपाला लागवड व फळबाग लागवड या विषयावर प्रशिक्षण देऊन त्यांना शाश्वत रोजगार उपलब्ध कसा होईल याकडे लक्ष केंद्रित करून शाश्वत उपजीविकेला प्राधान्य दिले पाहिजे, असे संचालक फादर थॉमस यांनी सांगितले.

कृषी विज्ञान केंद्र किल्ला रोहा येथील प्रमुख डॉ.मनोज तलाठी यांच्या मार्गदर्शनाखाली शेती व शेतीपूरक व्यवसाय यावर कार्य सुरू आहे. माणगाव तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर व आत्या अंतर्गत बी.टी.एम प्रमोद शिंदे (इंदापूर विभाग), प्रियांका सावंत, कृषी सहाय्यक (गोरेगाव विभाग), प्रतिभा खिलारी कृषी सहाय्यक (निजामपूर विभाग) हे शेताच्या बांधावर येऊन आदिवासीप बांधवांना पिकाची, रोगाची व उत्पन्न वाढीबाबत मार्गदर्शन करीत आहेत.



तालुक्यातील प्रगतशील शेतकरी आदिवासी बंधू भगिनींना डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ दापोली येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करून विविध संशोधन विभाग लोकांनी प्रत्यक्ष पाहिले. कंदवर्गीय पिकांची लागवड व उत्पादन यावर डॉ.पी.एस. गुडधे यांनी उत्तम असे मार्गदर्शन केले. या विभागामध्ये शेवर, कंद, रताळी, कणगर, घोरकंद, करांदा, सुरण,भाजीचा अळू,मिश्र कंद,इ.पिकांची जर लागवड करणार असाल तर आम्ही आपणांस कंद उपलब्ध करून देऊ व यापासून उत्तम उत्पन्न मिळते असे मार्गदर्शन केले. संस्थेने जूनमध्ये मोठ्या प्रमाणात विविध प्रकारची शेती करून उत्पादन वाढीवर लक्ष केंद्रित केले आहे. विशेष म्हणजे स्थलांतरांचे प्रमाण कमी करणे व शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हा मुळ हेतू असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे पूर्वनियोजन सर्व विकास दीप संस्थेचे सहाय्यक संचालक फादर मॅथ्यू यांनी केले. सरकारी यंत्रणेबरोबर समन्वय महेश मोरे (समन्वयक) यांनी कामकाज पाहिले तसेच वस्ती पातळीवरील लोकांची निवड करणे याकरिता सिस्टर निर्मलाताई, स्वाती मोरे, मंगेश हिलम, अक्षय जाधव यांनी कार्य केले. संचालक फादर थॉमस भाऊ यांनी उपस्थित बंधू-भगिनींना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्रसेवा समितीच्या महिला शेतीत रममाण!

**धाटाव : प्रतिनिधी**

जिल्ह्यात एकीतून सामूहिक शेतीचा नवाकोरा ब्रँड आणलेल्या रोह्यापासून जवळच असलेल्या निवी येथील तरुणांच्या कल्पकता, श्रमातील युवा कृषी उद्योगाच्या सामूहिक शेतीला रोहा शहरातील राष्ट्रसेवा समितीच्या महिलांनी समितीच्या उपक्रमांतर्गत भेट दिली. सामूहिक शेती उत्तम व आनंददायी शेती म्हणत साऱ्याजणी रममाण झाल्या.

तब्बल सहा एकरावर फुलविलेल्या कलिंगड, कडधान्य, भाजीपाला शेतीची त्यांनी माहिती घेतली. निसर्गरम्य डोंगराच्या पायथ्याशी शेतीत जणूकाही सहलीचा अनुभव घेतला.

राष्ट्र सेवा समितीच्या तालुका कार्यवाहिका अरुंधती पेंडसे यांच्या मार्गदर्शनाखाली समितीच्या महिलांनी निसर्गरम्य



वातावरणात वाढदिवस व गप्पांचा अनोखा सोहळा साजरा केला. दरम्यान, उपस्थित महिलांनी सामूहिक शेतीच्या प्रयोगाचे भरभरून कौतुक करत तरुणांच्या कल्पकतेला दाद दिली, तर आजकाल सामूहिक शेतीची गरज भासते, ही आनंददायी सामूहिक शेतीची संकल्पना सर्वदूर गेली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त झाली.

निवी येथील शेतीत महिला निसर्गाशी एकरूप झाल्या. या वेळी मार्केट हेड विनायक पाटील, प्रकल्प प्रमुख प्रशांत राऊत, रुपेश साळवी, नितेश बामुगडे यांनी उपस्थित महिलांचे स्वागत केले. राजेंद्र जाधव यांनी सामूहिक शेती, आनंददायी शेतीची माहिती महिलांना दिली. क्रिकेट, कबड्डी खेळात जास्त गुंतून गेलेल्या, हळदीचे भलते फॅड व पार्ट्या व्यसनांत गुंतलेल्या तरुणांत शेतीची आवड निर्माण व्हावी, पडीक शेती लागवडीत यावी हाच यामागील उद्देश असल्याचे सांगून शेती क्षेत्र वाढवा, अशी भावना जाधव यांनी बोलून दाखवली

तुम्हा तरुणांच्या सामूहिक शेती प्रयोगाची भुरळ सर्वांनाच पडली आहे, अशी दाद अरुंधती पेंडसे यांनी आपल्या मनोगतातून दिली.

# गुन्हा सिद्ध करण्यासाठी ‘लॅब ऑन व्हील’

सध्या पोलिसांसमोर नवनवीन गुन्ह्यांचे आव्हान उभे ठाकले आहे. दिवसागणिक गुन्ह्याचे स्वरूप बदलत आहे. गुन्हेगारांकडून गुन्ह्यासाठी होत असलेल्या नवीन पद्धतींचा उपयोग गुन्ह्याची उकल करताना अडचणीचे ठरत आहे. बदलत्या गुन्हेगारीनुसार तपासाकरीता असलेल्या यंत्रणेतही बदल होणे आवश्यक होते. त्यानुसार जलद गतीने तपास पूर्ण होण्यासाठी ‘लॅब ऑन व्हील’ अर्थात ‘मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन’ (न्यायवैद्यक प्रयोगशाळा) ची सुविधा राज्यात उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून २७ जानेवारी २०२५ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते महाराष्ट्रात २१ मोबाईल फॉरेन्सीक व्हॅनचा शुभारंभ करण्यात आला आहे. महाराष्ट्र हे देशातील मोबाईल फॉरेन्सीक व्हॅन सुरू करणारे पहिले राज्य ठरले आहे.



पूर्वी मर्यादित तंत्रज्ञानामुळे बोटांचे ठसे आणि साध्या रक्ताच्या चाचण्या यासारख्या मूलभूत तंत्रांवर भर देण्यात येत होता तसेच मानवी निरीक्षणावर अवलंबित्व असलेल्या प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांवर आणि प्राथमिक साक्षींवर मोठा भर दिला जात असे. यासोबतच कमी प्रमाणात डीएनए विश्लेषण व मर्यादित स्वरूपामुळे गुन्ह्याचा तपास जलद गतीने होत नव्हता. यामध्ये पुरावे नष्ट किंवा पुराव्यांशी छेडछाड करून आरोपी शिक्षेपासून स्वत:ला वाचविण्यात यशस्वी होतात. तसेच पुरावे तपासणे ही वेळखाऊ प्रक्रिया होऊन बसली होती, मात्र मोबाईल फॉरेन्सीक व्हॅनसारख्या प्रगत तंत्रज्ञानाच्या उपयोगाने डीएनए विश्लेषण, फॉरेन्सिक ऑडिओ, सायबर फॉरन्सिकचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येणार आहे. गुन्हेगारांचा मागोवा घेण्यासाठी जैव-रासायनिक आणि डिजिटल पुराव्यांचा वापर केला जातो. या व्हॅनमुळे गुन्हे स्थळीच असे पुरावे गोळा करणे शक्य होणार आहे.

### न्याय वैद्यक प्रयोगशाळा संचालनालय कार्य

न्याय वैद्यक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत विषशास्त्र, जैवशास्त्र, भौतिकशास्त्र, दारूबंदी, सामान्य उपकरणे व विश्लेषण विभाग कार्यरत आहेत. या विभागांच्या मदतीने खून, बलात्कार, बॉम्बस्फोट आणि अमली पदार्थ अशा गुन्ह्यांमध्ये विश्लेषण करून अहवाल देण्यात येतो. सध्याच्या काळात वाढते सायबर गुन्हे, डेटा चोरी व ऑनलाईन व्यवहारांमध्ये होणारी फसवेगिरी यामध्ये डिजीटल पुराव्यांची स्वीकार्यता माहिती तंत्रज्ञान कायद्यातंर्गत समाविष्ट आहे. त्यामुळे डिजिटल पुरावा हा अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी संचालनालय अंतर्गत ध्वनी, सायबर व ध्वनीफित विभाग कार्यरत आहे. तसेच मानसशास्त्र विभागात लाय डिटेक्टर, ब्रेन मॅपिंग, नार्को विश्लेषणाचा उपयोग करण्यात येतो.

### फॉरेन्सिक व्हॅनमधील सुविधा

फॉरेन्सिक व्हॅन अत्याधुनिक व प्रगत न्यायवैद्यक तंत्रासह सुसज्ज आहेत. व्हॅनमुळे गुन्हे दृष्य संकलित करणारे व व्हिडीओ कॉन्फरसिंगची सुविधा असणारे क्राईम सीन ॲप्लिकेशन, प्रशिक्षीत फॉरेन्सिक तज्ञाद्वारे कोणत्याही प्रकारचे क्राईम सीन प्रभावीपणे संकलित करता येणार आहे. क्राईम सीन ॲप्लिकेशन ब्लॉकचेन पद्धतीवर कार्य करते. जे पुरावे व ‘चेन ऑफ कस्टडीची’ नोंदणी सुरक्षीत करतात. ब्लॉक चेन तंत्रज्ञान मेटा डेटा आणि पुराव्यांच्या ‘फाईल इनक्रीप्टेड व्हॅल्यू’ संग्रहीत करून फॉरेन्सिक तपासात विश्वासार्हता निर्माण करतात.

### व्हॅनमधील उपलब्ध किट

क्राईम सीन कॉर्डीनिंग ऑर प्रोटेक्शन किट, जनरल इन्व्हेस्टींगेटींग किट, एव्हीडन्स पॅकिंग अँड कलेक्शन किट, फूट अँड टायर ब्रीट कास्टीग किट, हाय इन्सेंटीकेंटींग फॉरेन्सिक लाईट सोर्स, ब्लड व सिमेन्स डिटेक्शन किट, डिएनए कलेक्शन अँड सेक्स्युअल असॉल्ट किट, एक्सप्लोझीव्ह डिटेक्शन किट, नार्कोटीक डिटेक्शन किट, गनशॉट रेस्युडींग टेस्ट किट, बुलेट हॉल्ट टेस्टींग किट, आर्सल इन्व्हेस्टींगेटींग विथ गॅस डिटेक्टर आणि सायबर फॉरेन्सिक किट अशा किटसह फॉरेन्सिक व्हॅन सुसज्ज असेल. या व्हॅनमध्ये रक्त, डीएनए संग्रहण आणि बलात्कार गुन्ह्यात आवश्यक पुरावे गोळा करता येणार आहे. वैज्ञानिक तज्ज्ञ व सहाय्यक कर्मचारी व्हॅनमध्ये असतील. व्हॅन सीसीटिव्हीने सज्ञ असून कनेक्टेड असणार आहे. त्यामुळे संबंधित पोलीस स्टेशनला सबंधित गुन्ह्यकामी गोळा केलेल्या पुराव्यांची माहिती देता येणे शक्य होणार आहे. ही एकत्र प्रणाली असून यामध्ये सुसज्ञ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन, फॉरेन्सिक किट्स, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि क्राईम सीन प्लिकेशन यांचा समावेश आहे. यामुळे पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि अचूक बनणार आहे. तपास यंत्रणा आणि फॉरेन्सिक तज्ज्ञ यांच्यात उत्तम समन्वय साधला जाणार आहे.

### अशी काम करेल फॉरन्सिक व्हॅन

प्रत्येक व्हॅनमध्ये दोन तज्ज्ञ अधिकारी, एक मदतनीस आणि नियंत्रण कक्षात एक सहायक संचालक २४ तास कार्यरत असेल. पोलीस स्टेशनने नियंत्रण कक्षाला गुन्हा अन्वेषण ठिकाणाची माहिती देताच नियंत्रण कक्ष संबंधित फॉरेन्सिक व्हॅन युनीटला याबाबत माहिती देतील. व्हॅन टीम तपास अधिकाऱ्याशी समन्वय साधत गुन्ह्याच्या ठिकाणी पोहचेल. फॉरेन्सिक तज्ञ मोबाईल टॅबलेटच्या माध्यमातून गुन्ह्याचे ठिकाण ‘क्राईम सीन ॲप्लिकेशन’द्वारे निश्चित करतील. या ॲप्लिकेशनद्वारे गुन्हे स्थळाचे फोटो, व्हीडीओ घेण्यात येतील. फॉरेन्सीक तज्ज्ञ मार्गदर्शक तत्वानुसार गुन्हे स्थळावर फॉरेन्सीक किटच्या साहाय्याने पुरावे गोळा करतील आणि आवश्यकतेनुसार क्राईम सीन ॲप्लिकेशनमधील व्हिडीओ कॉलद्वारे नियंत्रण कक्षातील सहायक संचालक यांच्याशी संपर्क साधतील. फॉरेन्सिक तज्ज्ञ सर्व गोळा केलेले पुरावे व्हॅनमधील सीसीटीव्हीच्या निगराणीखाली सील करून एका बारकोडदद्वारे संरक्षीत करतील.

गुन्हे स्थळावरील सर्व छायाचित्रे, व्हिडीओ, ऑडीओ संदेश आणि पुरावे यासह गुन्ह्याच्या दृष्याचे तपशील सहायक संचालकांना पाठवतील. नियंत्रण कक्षातील सहायक संचालक तपशील तपासून गुन्ह्याच्या दृष्टीने पुरेसा व योग्य असल्याची खात्री करून मान्यता प्रदान करतील. व्हॅनमधील फॉरेन्सीक तज्ज्ञ गुन्ह्याच्या ठिकाणच्या तपशीलांमध्ये कोणताही बदल करू शकणार नाही. तज्ज्ञ क्राईम सीन अहवाल तयार करतील आणि अहवाल सर्व पुराव्यांसह पोलीसांना सुपूर्द करतील. यामुळे गुन्हे स्थळावरून गोळा केलेल्या सर्व पुराव्यांची सुरक्षितता अधोरेखित होते. ब्लॉक चेन तंत्रज्ञानाचा वापर करून क्राईम सीन ॲप्लिकेशन गुन्हे स्थळावर तपासणी करणार आहे. यामध्ये पुरावे संग्रहित करून बारकोडद्वारे सुरक्षित करण्यात येणार आहे. गुन्ह्यांच्या उलगडा करण्यामध्ये फॉरेन्सिक सहाय्य पुरविण्यासाठी, पुरावे गोळा करणे व विश्लेषण करण्यासाठी ही व्हॅन उपयुक्त ठरणार आहे.

### व्हॅन प्रकल्पाचा उद्देश

गृह विभाग अंतर्गत राज्य शासनाने मंजूर केलेल्या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन प्रकल्पाचा उद्देश भारतीय न्याय सुरक्षा संहितेतील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक आहे. गुन्ह्यांमध्ये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा तज्ज्ञांकडून सात वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या प्रकरणांमध्ये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा तज्ञांकडून परिस्थितीजन्य पुरावे गोळा करणे बंधनकारक आहे. गुन्हे स्थळावरुन परिस्थितीजन्य पुरावे गोळा, जतन करण्याकरीता तसेच व्हिडीओग्राफी व फोटोग्राफीकरिता न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या तज्ञांना किट व केमिकल्ससह मोबाईल व्हॅनचा वापर करण्यात येणार आहे.

### मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन प्रकल्पाचे स्वरूप

महाराष्ट्र सरकारने प्रकल्पास लागणाऱ्या निधीला मंजूरी दिली आहे. प्रकल्पांतर्गत २५९ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एकूण २५९ व्हॅन्सकरिता फॉरेन्सीक किट्स, कंट्रोल रूम, केमिकल्स आणि आवश्यक सॉफ्टवेअर ब्लॉकचेन ॲप्लिकेशन्ससह पुढील पाच वर्षांकरिता ऑपरेशन आणि देखभालीसह प्रशिक्षित फोरेन्सिक तज्ज्ञ सुसज्ञ असणार आहेत. उपक्रमाची परिणामकारकता सुनिश्चित करण्यासाठी सरकारने पायलट प्रकल्पासाठीसुद्धा निधी मंजूर केलेला आहे. या प्रकल्पाअंतर्गत पायलट प्रकल्प सुरुवातीला मुंबई, नवी मुंबई, नागपूर शहर आणि जळगाव जिल्ह्यात राबविण्यात येत आहे यामध्ये एकूण २१ व्हॅन आहे. त्यानंतर प्रत्येकी ११९ व्हॅनसह दोन टप्प्यात उर्वरित एकूण २३८ व्हॅनसह संपूर्ण राज्यात हा प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे.

प्रत्येक उपविभागीय पोलीस अधिकारी व उपायुक्त यांचे कार्यालयात एक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन कार्यरत राहणार आहे. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय व प्रत्येक प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे एक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन असे एकूण आठ व्हॅनचा वापर अतिमहत्वाच्या, संवेदनशील तसेच आव्हानात्मक प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे. प्रत्येक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनमध्ये सहाय्यक रासायनिक विश्लेषक, वैज्ञानिक सहाय्यक, प्रयोगशाळा परिचर आणि चालक राहणार आहेत. अशा एकूण २५९ व्हॅनसाठी एकूण २२०० पदेही मंजूर करण्यात आली आहेत. या प्रकल्पामुळे निश्चितच गुन्हे सिद्धतेमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे.

**-निलेश तायडे, विभागीय संपर्क अधिकारी**

# मोहोपाडा टायगर संघ व्हीपीएलचा मानकरी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा व नवीन पोसरी व्यापारी प्रीमियर लीगचे आयोजन रिसवाडी येथील सेंट विन्सेंट पिल्लोटी शाळेसमोरील टर्फमध्ये प्रकाशझोतात करण्यात आले होते. या टूर्नामेंटमध्ये दिवेश जैन व अमित शाह यांच्या मोहोपाडा टायगर संघाने विजेतेपद पटकाविले.

व्यापारी नेहमी त्याच्या दुकानात व्यस्त असतात, पण आपल्या नेहमीच्या कामातून एक विरंगुळा म्हणून ही नाईट टर्फ क्रिकेट स्पर्धा खेळविण्यात आली. यामध्ये एकूण ६४ व्यापाऱ्यांनी वेगवेगळ्या आठ संघांतून सहभाग घेतला. रोनक ओसवाल यांचा मोहोपाडा स्मशर्स हा संघ उपविजेता ठरला, तर ऋतिक बाफना यांचा संघ मोहोपाडा सुपर किंगने तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले.

सामनावीर दिवेश जैन, उत्कृष्ट फलंदाज रौनक ओसवाल आणि उत्कृष्ट गोलंदाज म्हणून प्रदीप पाटील यांची निवड करण्यात आली. विजेते संघ व वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत पंचाचे काम सचिन पटेल, मुकुंद पटेल व यश शाह यांनी पाहिले, तर समालोचन संतोष चौधरी यांनी केले.

# सार्थक महामुणकरचा तिरंदाजीत ‘सुवर्ण’वेध

**माणगाव : बातमीदार**

माणगाव येथील गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी सार्थक सुशील महामुणकर याने मुंबई वर्सोवा येथे आयोजित विभागीय शालेय तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. त्यामुळे सार्थकची पुणे येथील होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

मुंबई, कोकण, विदर्भ, मराठवाडा, पुणे या पाच विभागांची एकत्रित शालेय तिरंदाजी स्पर्धा वर्सोवा येथे

**राज्य पातळीवर निवड**



झाली. यामध्ये माणगावचा इयत्ता सहावीत शिकणारा सार्थक महामुणकर याने अचूक वेध साधला. आता तो पुणे येथे ९ व १० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्य पातळीवरील स्पर्धेत सहभागी होईल.

याबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा गांधी, चेअरमन नरेंद्र गायकवाड, अरुण पवार, नितीन बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, ॲड. विनोद घायाळ, मुख्याध्यापिका मनिषा मोरे, सर्व संचालिका, शिक्षक, पालक आणि प्रशिक्षक यांनी सार्थकचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# रणजी ट्रॉफीत मुंबईचा मेघालयवर दणदणीत विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

रणजी चषक क्रिकेट स्पर्धेत गतविजेत्या मुंबईने मेघालय संघावर एक डाव आणि ४५६ धावांनी दणदणीत विजय मिळविला. या सामन्यातील अष्टपैलू कामगिरीसाठी शार्दुल ठाकूरला सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

मेघालय संघ प्रथम फलंदाजी करताना ८६ धावांवर गारद झाला होता. प्रत्युत्तरात मुंबईने पहिला डाव ७ बाद ६७१ धावांवर घोषित केला. यानंतर दुसऱ्या डावात मेघालयचा संघ १२९ धावांवर गारद झाला. सामन्याच्या पहिल्या डावात गोलंदाजी करताना शार्दुल ठाकूरने मेघालयविरुद्ध हॅट्‌ट्रिक घेत चार फलंदाजांना शून्यावर बाद केले. त्यानंतर मेघालयविरुद्ध पहिल्या डावात फलंदाजी करताना शार्दुलने वेगवान फलंदाजी करत ३० चेंडूत अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतर ४२ चेंडूत ८४ धावांची खेळी केली. दरम्यान, या विजयामुळे मुंबईचे २९ गुण झाले आहेत. मुंबईला बाद फेरीत पोहचण्यासाठी अन्य दोन अव्वल संघांच्या निकालावरही लक्ष ठेवावे लागणार आहे.

# पनवेल तक्का येथील नगरसेवक चषक स्पर्धेचे उद्‌घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

तक्का येथील मंगलमूर्ती क्रिकेट संघाच्या वतीने नगरसेवक चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा १ ते २ जानेवारीदरम्यान रंगणार आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते आणि जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती शनिवारी झाले.



स्पर्धेतील विजेत्या संघाला २५ हजार ५७ रुपये, उपविजेत्या संघाला १५ हजार ५७ रुपये अणि दोन्ही संघांना आकर्षक चषक देऊन गौरवण्यात येणार आहे तसेच उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज व क्षेत्ररक्षक यांना आकर्षक चषक, तर सामनावीरास सायकल बक्षीस देण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या उद्‌घाटनावेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, भाजपचे तक्का अध्यक्ष रघुनाथ बहिरा, संदीप बहिरा, प्रतिक बहिरा, फैजल मेटकर, तुकाराम बहिरा, भाऊ ठाकूर, भानूदास ठाकूर, श्रेयस बहिरा, मित बहिरा, प्रशांत बहिरा, प्रमोद बहिरा, प्रशांत पाटील, रत्नेश बहिरा, जितू खुटकर, बबन कांबळे, दिनेश बहिरा, किरण बहिरा, राम सारंग, अण्णा भगत, प्रमोद खुटकर, नितेश बहिरा, हिरामण पाटील, योगेश बहिरा आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेसाठी सुभाष पाटील प्रमुख पंचपदी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उत्तराखंडमधील गोलपार येथे ३८वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा खेळली जात आहे. या स्पर्धेत ४ ते ९ फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या तायक्वांदो स्पर्धेसाठी प्रमुख पंच म्हणून रायगडातील तायक्वांदो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्वांदो युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची पंचपदी निवड झाली आहे.

सुभाष पाटील सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी ते ४ फेब्रुवारी रोजी उत्तराखंड येथे रवाना होणार आहेत. त्यांना या स्पर्धेसाठी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि रायगड तायक्वांदो असोसिएशनचे सर्व पदाधिकारी तसेच इतर मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.





## माघी गणेशोत्सव

**पनवेल : माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात शनिवारी साजरा झाला. या उत्सवानिमित्त गणपती मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. दरम्यान, माघी गणेशोत्सवानिमित्त भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी नवीन पनवेल, पनवेल, वळवली, कानपोली, धानसर आणि खारघरसह विविध ठिकाणी गणेश उत्सवांना भेट देत मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, संतोष खैरे, जगदीश घरत, सचिन पाटील, रमेश पाटील, कैलास पाटील, काळुराम गोंधळी, अमर उपाध्याय, शुभ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजकांकडून अरुणशेठ भगत व सहकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले.**





















मंगलमूर्ती मित्र मंडळ, गव्हाण (वर्ष ३९वे)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com